**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : २**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- २९ /०५/२०१४

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती **सभा क्र -२ सोमवार दि.०२/०६/२०१४ रोजी दुपारी १.३० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक- ०२/०६ /२०१४ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| २ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ बुधवार दिनांक २३/१०/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८ शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | अर्जदार श्री.भारत नानाकराम गुरूनानी दिपक नानकराम गुलनानी भोग-सौ. मनिषा दिलीप गालम, रा.कुष्ठधाम रोड, सावेडी ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१, वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ आकारणी केलेली पाणीपट्टी + शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

...२

| | |
|---|---|
| ७ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन२०१३-२०१४या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस दैनंदिन दुरूस्तीकामी लागणारे इलेक्ट्रीक साहित्य उदा.४०वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर ,चोक,टयुब पट्टी,१५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर कॉपर केबल, वायर,फॅन,मोटारपंप, मेनस्वीच स्टॉटर,फ्युज,यु.पी.एस. टयुबलर बॅटरी इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ९ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य व माल जरूरी प्रमाणे खरेदीकामी ई- निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करून वार्षिक निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| १० | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीसाठी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयाची सन २००९-१० पर्यतची थकबाकी तसेच ठेउन सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्ट |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीतील राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपटयांचे सोशियो इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व बांधकामावर सुपरव्हिजन करणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या ई निवीदांचा तुलनात्मक तक्ता मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ मधील भुषणनगर केडगाव येथील महिला जिम महानगरपालिकेमार्फत चालविणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे एस.टी. स्टॅण्ड जवळील इंम्पिरियल चौकातील शेतक-यांचा पुतळा काढणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. २ - मा.स्थायी समिति सभा क्र.- ७ बुधवार दि. २३/१०/२०१३ व सभा क्र.-८ शुक्रवार दि.०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- ३ ते १६ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-२**

विषय क्रमांक- २ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- २ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ बुधवार दिनांक २३/१०/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८ शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ बुधवार दिनांक २३/१०/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८ शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा. स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

***

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- मागील स्थायी समिती सभा क.७ दिनांक २३/१०/२०१३ व मा.स्थायी समिती सभा क्र. ८ दि.०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- इतिवृत्त वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे इतिवृत्त सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.श्री. दिप चव्हाण :- दि. २३/१०/२०१३नंतर स्थायी समिती ची सभा झाली का?

प्र.नगरसचिव श्री.वैदय :- होय झाली

मा.श्री. दिप चव्हाण :- कधी झाली ?

प्र.नगरसचिव श्री.वैदय :- . दि.०१/११/१३ रोजी सभा झाली.

मा.श्री. दिप चव्हाण :- मग त्या सभे मध्ये मागील इतिवृत्त कायम का केले नाही.?

प्र.नगरसचिव श्री.वैदय :- दि.१/११/२०१३ रोजी च्या स्थायी समिती करीता प्रलंबित विषयांची यादी मा.सभापती यांनी दि. २८/१०/२०१३ रोजी मागणी केल्याने सादर केली होती. दि.२३/१०/२०१३ च्या स्थायी समिती सभेनंतर दि.२६ ते २७ /१०/२०१३ हे दोन दिवस चौथा शनिवार व रविवार मुळे सुटटीचे होते. त्यामुळे दि.२४ ते २५ /१०/२०१३ हे दोनच कार्यालयीन कामकाजाचे दिवस उपलब्ध होते. त्यामुळे या दोन दिवसांत इतिवृत्त लिहुन झालेले नाही. ही बाब तत्कालीन सभापती यांना सांगितली. त्यावेळी दोन्ही सभांचे इतिवृत्त नंतर घेवू असे त्यांनी सांगितले. त्यामुळे दि.१/११/२०१३ च्या सभेत दि.२३/१०/२०१३ चे इतिवृत्त घेता आले नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- सुचक अनुमोदकचे नियम काय आहे. मागच्या एका पैशाचे बिल दिले नाही तर मागच्या इतिवृत्ताला मंजुरी कशी दयायची.

मा.सभातपी साहेब :- मागच्या सभेचे डिटेल दया. सर्व सदस्यांना सगळी माहिती दया नंतर मंजुरीचे बघू आता काही इतिवृत्त कायम करू नका.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मी महासभेमध्ये एका विषयावर चर्चा केला आणि दुस-याचे विषयाला माझे नाव दिले म्हणून मी हा विषय घेतला.

मा.श्री. दिप चव्हाण :- हा विषय तहकुब ठेवा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हा विषय तहकुब ठेवा. पुढील सभेमध्ये घ्या.

मा.सभापती साहेब :- मागील सभा क्र. ७, सभा क्र.८ चा सभेचे संबंधीत विभागाकडून सादर केलेले प्रस्ताव ,त्यावर केलेले ठराव , ठरावाच्या करण्यात आलेल्या अंमलबजावणीची कार्यवाही व आजपर्यंतची स्थीती, त्या अनुशंगाने केलेली कामे, याप्रकरणी अदा करावयाच्या देयकांची सद्यस्थिती याबाबत सर्व तपशिलवार अहवाल संबंधीत विभागाकडून प्राप्त करून घेण्यात यावा. सर्व अहवाल प्राप्त झाल्यानंतर इतिवृत्तासोबत सादर करावे. त्यानंतर यावर निर्णय घेतला जाईल. पुढील सभेमध्ये विभागाकडून आलेल्या वरील माहितीसह सादर करा.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ७ बुधवार दिनांक २३/१०/२०१३ व मा. स्थायी समिती सभा क्रमांक-८ शुक्रवार दिनांक ०१/११/२०१३ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे बाबत. मा.सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

संबंधीत विभागाकडून सादर केलेले प्रस्ताव ,त्यावर केलेले ठराव , ठरावाच्या करण्यात आलेल्या अंमलबजावणीची कार्यवाही व आजपर्यंतची स्थीती, त्या अनुशंगाने केलेली कामे, याप्रकरणी अदा करावयाच्या देयकांची सद्यस्थिती याबाबत सर्व तपशिलवार अहवाल संबंधीत विभागाकडून प्राप्त करून घेण्यात यावा. सर्व अहवाल प्राप्त झाल्यानंतर इतिवृत्तासोबत सादर करावे. त्यानंतर यावर निर्णय घेतला जाईल. सध्या हा विषय तहकुब ठेवावा व माहितीसह सादर करा.

सर्व अहवाल प्राप्त होईपर्यंत विषय तहकुब ठेवा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. दिप चव्हाण सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ३ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ३ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. मार्केट विभाग जा.क्र. १९१ दि.२३/८/२०१३

संदर्भ :- श्री. अजय भिमराज चितळे यांचा दिनांक २९/३/२०१२ रोजीचा अर्ज

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार विनंती रिपोर्ट मार्केट विभागामार्फत देण्यांत येतो की, अमरधाम कंपौंड लगत खुली जागा क्र.१४ च्या बाबत संबंधित विभागाकडून योग्य तो अभिप्राय घेउन भाडे करार व बांधकाम परवानगी मिळणेबाबत दि.२९/३/२०१२ श्री. अजय भिमराज चितळे यांच्या अर्जावर प्रस्ताव सादर केला असता टि.पी. आपल्या पुर्वीच्या अभिप्रायाबाबत पुनश्च खात्री करून अहवाल द्यावा असे दि.३/५/२०१२ रोजी मा.उपायुक्त (कर) यांना आदेशीत केले नुसार सदरचा प्रस्ताव नगररचना विभागाकडे पाठविला असता अमरधाम गाळा क्र.१५ लगत खुली जागा कागदपत्रावरून सदर जागेचे स्थान निश्चित करता येत नाही. सबब समक्ष सदर जागा दाखविणेसाठी संपर्क साधावा असे नगरररचनाकार यांनी कळविल्यानुसार दि.२०/७/२०१२ रोजी नगररचना विभागातील लिपिक श्री. सासवडकर यांस विषयांकित जागा समक्ष दाखवली आहे. याबाबत मार्केट विभाग जा.क्र. ८१ दि.२१/७/२०१२ रोजी सदरचा प्रस्ताव टि.पी. कडे पाठविला असता सदर जागा रस्त्याचे बाजुस असुन सदर जागा सोडून उर्वरीत जागा मनपाने भाडे तत्वावर दिलेल्या आहेत सदर जागा रस्त्याचे बाजुस भिंती लगत असुन ती कोणास भाडे तत्वावर दिलेली नाही. सदर जागेवर एक टपरी आहे ती काढणे आवश्यक आहे सबब सदर जागा तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्वावर देणेस हकरत नाही. असे इकडेस कळविले असता दि.५/१०/२०१२ रोजी फेरसादर करून अर्जदार यांचे कडून किती दरमहा भाडे व अनामत रक्कम घ्यावी याबाबत मार्केट विभाग जा.क्र. १४२ दि.५/११/२०१२ अन्वये कळविले असता जा.क्र. टि.पी. ३४३६ दि.१९/११/२०१२ अन्वये १ वर्षाच्या कालावधी साठी दरमहा भाडे रू.५००/- डिपॉझीट रू.३००००/- इतके घेणे योग्य होईल असे इकडेस कळविले असता दि.२३/११/२०१२ अन्वये सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी व निर्णयाकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित सबब आदेशार्थ सादर केले असता नगररचनाकार यांनी समक्ष चर्चा करावी असे दि.१४/१२/२०१२ रोजी मा.आयुक्त साहेब यांनी आदेशीत केलेनुसार सदरचा प्रस्ताव नगरचना विभागाकडे पाठविला असता त्यांनी मा.आयुक्त साहेब यांचेशी समक्ष चर्चा करून जा.क्र. ६९३३ दि.२२/८/२०१३ अन्वये खुल्या जमिनिचे क्षेत्र १०x१४= १४० चौ. फुट म्हणजेच १३.०१ चौ.मी. अर्जदार यांना दरमहा भाडे रू.६००/- इतके भाडे १ वर्षाच्या कालावधी साठी आकारणे योग्य होईल. अर्जदार यांचे अर्जाप्रमाणे फक्त १ वर्षाकरीता जागा देणे बाबत कळविले आहे. तसेच सदर जागेमध्ये बांधकाम करणेस परवानगी देण्यांत आलेली नाही. तसेच जमिन मुल्यांच्या ५०% इतके डिपॉझीट म्हणजेच साधारणपणे रू.३०,०००/- इतके डिपॉझीट घेणे योग्य होईल. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर घेणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी दि.१४/८/२०१३ रोजी मान्यता दिली आहे.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर घेणेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुली जागा भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा..श्री. दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- अर्जदार यांनी त्यांचे ऐवजी त्यांचे वडीलांचे नावे हि खुली जागा मीळणे करीता आज पत्र दिले आहे. त्यामुळे या विषयावर आजच्या सभे मध्ये घेता येईल का, उपायुक्त सांगा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- अर्जदाराच्या वडीलांच्या नावे अर्ज घ्यावा लागेल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हा विषय आज घेता येणार नाही.

मा.श्री. कुमार वाकळे :- हा विषय पुढील सभेमध्ये ठेवा.

मा.श्री.संपत बारस्कर :- हा विषय पुढील सभेमध्ये ठेवा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- हा विषय फेरसादर करा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- मार्केट विभागाकडे प्रस्ताव पुन्हा पाठवून अर्जदार यांच्या फेरसादर करावा.

मा.सभापती साहेब :- त्यांचे नाव कमी करून त्यांचे वडीलांचे नावे जागा द्यावी असा अर्ज आहे. त्यासोबत वडीलांच्या अर्ज नसल्याने विभागाने त्यांचा अर्ज घेउन फेरसादर करावा. पुढील सभेमध्ये घ्या.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अमरधाम कंपौड लगत गाळा क्र.१५ लगची खुली जागा क्र.१४ वर खुल्या जमिनीचे क्षेत्र १०x१४=१४० चौ. फुट खुली जागा अर्जदार श्री. अजय भिमराज चितळे यांना १ वर्षे भाडेकराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन देणे बाबत असलेला ऑफिस रिपोर्ट.आणि अर्जदार यांनी गाळाधारकाचे नांव बदण्याबाबत सादर केलेल्या अर्जा नुसार सभेत कार्यवाही करता येणार नाही.त्यामुळे मार्केट विभागाकडे प्रस्ताव पुन्हा पाठवून अर्जदार यांच्या आजच्या अर्जावर नियमानुसार कार्यवाही करून फेरसादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ४ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ४ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार श्री.भारत नानाकराम गुरूनानी दिपक नानकराम गुलनानी भोग-सौ. मनिषा दिलीप गालम, रा.कुष्ठधाम रोड, सावेडी ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१, वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ आकारणी केलेली पाणीपट्टी + शास्तीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर म.न.पा. सावेडी वसुली विभाग जा.क्र.९३६८ दि.१/११/२०१३

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.५४ चे वसुली लिपिक श्री. एस.सी.तायडे यांजकडून देण्यांत येतो की, प्रभाग समिती क्र.१ सावेडी येथील मालमत्ता कर वसुली वॉर्ड क्र.५४ मधील मालमत्ता धारक श्री. भारत नानकराम गुरूनानी दिपक नानकराम गुरूनानी भोग-मनिषा दिलीप गालम यांनी दिनांक २०/१०/२००९ दिनांक १८/०२/२०१० व दिनांक १९/४/२०१२ रोजी अर्ज दाखल करून कळविले आहे की वॉर्ड क्र. ५४ मधील बि. नं.१४८ मध्ये नळ कनेक्शन नसतांना आकारणी केलेली पाणीपट्टी कराची आकारणी रद्द करणेबाबत विनंती केलेली आहे.

मालमत्ता धारक यांचा दिनांक १९/४/२०१२ चा विनंती अर्ज प्रभाग समिती क्रमांक १ सावेडी येथील पाणी पुरवठा विभागाकडे नळजोड आहे किंवा नाही याबाबत पाणी पुरवठा फिटर यांचा स्थळपहाणी करून अहवाल प्राप्त करून घेणेसाठी पाठविले असता पाणी पुरवठा विभागाकडून दिनांक १९/१/२०१३ रोजीचा अहवाल प्राप्त झालेला असून पाणी पुरवठा फिटर यांनी सदरील मालमत्तेत ब्युटीपार्लर चालू असून सदरील गाळयात नळ कनेक्शन आढळुन येत नाही याबाबत अहवाल दिलेला आहे. मालमत्ता धारक गालम यांचेकडे ३१ मार्च २०१४ अखेर एकूण थकबाकी ७५७११/- दर्शविण्यांत आलेली असुन सदरील बिलात ४८२५० पाणी पट्टी कराची रक्कम व दंडात्मक कर २४७६८ दर्शविला आहे. मालमत्ता करापोटी २६९३ रूपये थकीत असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे.

मालमत्ता धारक यांचा दिनांक २०/१०/२००९ दिनांक १८/२/२०१० व दिनांक १९/४/२०१२च्या अर्जानुसार तसेच पाणीपुरवठा फिटर यांच्या दिनांक १९/७/२०१३ ने समक्ष स्थळपहाणी अहवालानुसार सदरील मालमत्तेवर नळजोड नसल्याने वसुल होण्याजोगी थकबाकी ४८२५०/- रूपये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ अन्वये वसुल न कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसुल करण्यासाठी झालेलया खर्चाबद्दल येणे असलेली जी कोणताही रक्कम त्याच्या मते वसुल होण्याजोगी नसेल ती वेळोवेळी निर्लेखित करता येईल याबाबत तरतूद आहे. तथापी अहवाल आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर वसुली विभाग यांचा अभिप्राय की, समक्ष जागा दाखवणे

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, समक्ष जागेची पहाणी व चौकशी केली असता जागेचा बंद आहे. म्यु.पल फिटर यांच्या पहाणी अहवालानुसार व समक्ष पहाणी नुसार जागे मध्ये नळ कने. नसल्याचे आढळुन आली. माहितीस्तव सविनय सादर.

यावर वॉर्ड ऑफिसर-१ यांचा अभिप्राय की, पहाणी समिती समोर ठेवा.

यावर मा.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करणे, समक्ष चर्चा झाली. चर्चेनुसार हेडफिटर, प्रभाग अभियंता, प्रभाग अधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार नळ कनेक्शन नसतांना पाणी पट्टी लावण्यांत आलेली आहे. याबाबत मु.ले.प. यांचा अभिप्राय घेणे.

यावर मु.ले.प. यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी व कर निरीक्षक प्र.स.क्र.१ तसेच समक्ष पाहणी अहवाल यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, नळ कनेक्शन नसतांना प्रस्तावानुसार नमुद केलेली पाणीपट्टी आकारणीची रक्कम रू.४८,२५०/- + होणारी शास्तीची रक्कम निर्लेखित करणेकामी मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ नुसार सदरचे प्रकरण मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा निर्णयास्तव ठेवणे विषयी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मे. स्थायी समितीचे निर्णयार्थ ठेवावे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## <u>चर्चा :-</u>

मा.सभापती साहेब :- मनिषा दिलीप गालम यांना नळ कनेक्शन पाणीपट्टी रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.सभापती साहेब :- स्थायी समिती मध्ये सर्व प्रकरणे एकाच वेळी का ठेवत नाही .

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- अनेक नागरिकांचे ७-७ अर्ज केले पण त्यावर कार्यवाही होत नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- सगळया अर्जदारांची एकूण यादी करून सर्व प्रकारणे सादर करा.

मा.सभापती साहेब :- ४ ही झोन मधील सर्व निर्लेखितची प्रकरणे करा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- दरवर्षी त्यांना सांगतात की या वर्षाची पट्टी भरा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांनी ही रक्कम महानगरपालिकेकडे भरली आहे. जादा रक्कम घेतली ती माघारी देणार का ?

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- मग ही रक्कम कशी देणार. रिपोर्ट मध्ये हे नमूद केले आहे का ?

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- ही रक्कम डिमांडला दिसते पण भरलेली नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- पाणीपट्टीवर शास्ती २% लावता येते का ?

मा.श्री. दिप चव्हाण :- या प्रकरणात कधीपासून ही आकारणी आहे ते वाचून सांगा.

प्रभाग अधिकारी श्री. सोनवणे :-रिपोर्ट वाचला ३१/३/२०१४अखेर७५७११/- दर्शविली पाणीपट्टी आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- शास्ती किती दाखवली आहे यामध्ये

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :-प्रस्ताव वाचा.

मा.श्री. दिप चव्हाण :- शास्ती वसुल करणार का ?

उपायुक्त साहेब श्री.बेहरे :- होय.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- माझे म्हणणे असे की त्यांच्या सन २००९ला पहिला अर्ज केला त्यावेळी किती रक्कम येणे होती. त्यावर कार्यवाही केली नाही. तेव्हापासुनची थकबाकी आहे.ती नागरीकांची चुक नाही.

मा.सभापती साहेब :- मी अत्ताच सांगीतले आहे त्यांनी रक्कम भरली आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- मग हा रिपोर्ट कशा साठी केला.जे रीफंड दयायचे पैसे आहे ते रिपोर्ट मध्ये लिहिणे आवश्यक होते. फेरप्रस्ताव ठेवा.कारण निर्लेखीत आणि रिफाड हा वेगवेगळा विषय आहे.

मा.सभापती साहेब :- त्या उमेदवार होत्या त्यांनी पैसे भरले आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- ऑफिस ने उल्लेख करायला पहिले होता की त्यांनी किती रक्कम भरली ती परत करायची आहे.

प्रभाग अधिकारी श्री. सोनवणे :- प्रस्ताव केल्यानंतर भरली आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- हा प्रस्ताव अद्यावत करून सादर करा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- फेरप्रस्ताव ठेवायला पाहिजे होता.

मा.श्री. मा.श्री. दिप चव्हाण :- श्रीमती गालम यांची जादा भरलेली रक्कम आणि त्यांचा रिफंड तसेच निव्वळ निर्लेखीत करावयाच्या रकमेबाबत फेरप्रस्ताव सादर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- केलेल्या प्रस्तावामध्ये ती रक्कम नमुद केलेली दिसुन येत नाही.

मा.सभापती साहेब :-अर्जदार यांनी मागील वर्षा अखेर सर्व रक्कम भरली आहे. निर्लेखीत रकमेबाबत चा फेरप्रस्ताव सादर करावा.

**ठराव :-**अर्जदार श्री.भारत नानाकराम गुरूनानी दिपक नानकराम गुलनानी भोग-सौ. मनिषा दिलीप गालम, रा.कुष्ठधाम रोड, सावेडी ,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्रमांक-१, वॉर्ड क्रमांक ५४, बील क्रमांक १४८ आकारणी केलेली पाणीपट्टी + शास्तीची रक्कम निर्लेखित करणे बाबत प्रस्ताव आहे.

अर्जदार यांनी मागील वर्षा अखेर सर्व रक्कम भरली आहे.सादर केलेल्या प्रस्तावामध्ये भरलेली रक्कम नमुद केलेली दिसुन येत नाही. अर्जदार यांची जादा भरलेली रक्कम आणि त्याची रिफंड करावयाची रक्कम तसेच निव्वळ निर्लेखीत करावयाच्या रकमेबाबत चा फेरप्रस्ताव सादर करावा.तसेच सर्व निर्लेखित करावयाच्या रकमाबाबचे प्रस्ताव एकाच वेळी स्थायी समीती पुढे सादर करावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. दिप चव्हाण सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ५ सोमवार दि. ०२/०६/२०१४

---

ठराव क्रमांक- ५ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र./वर्क. १६३ दिनांक १/१/२०१४

विनंती की, १) संदिप प्रभाकर पुंड, २) नितीन अण्णासाहेब मुरकुटे, ३) शरद मल्हारी साळवे , ४) सागर आसाराम खताडे, ५) संजय हिरामण नागापुरे, ६) गौतम भास्कर तांबे, ७) नितीन किशोर हुशारे यांनी दिनांक १९/११/२०१३ रोजी अर्ज देवून त्यामध्ये " आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर मुळानगर, विळद व नागापुर पाणी पुरवठा केंद्र येथे पंपचालक, विजतंत्री व जोडारी या पदावर काम करीत आहोत. सदर कराराची मुदत दिनांक १८/१२/२०१३ रोजी संपत आहे. तरी आम्हांला तात्पुरत्या स्वरूपात पुढील कालावधी करीता मानधनावर नेमणूक करण्यांत यावी." असे नमुद करून विनंती केलेली आहे.

सदर अर्जावर मा. मॅके.इंजि. पा.पु. विभाग प्रमुख यांनी त्यांचेकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना १०२४ दिनांक २०/११/२०१३ अन्वये इकडेस पत्र देवुन त्यामध्ये "संदर्भिय पारीत आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील नमुद तांत्रिक हुद्दाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदावर दिनांक १७/०६/२०१३ रोजी पासुन ६ महिन्याकरीता निर्देशित अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूक करण्यात आलेली आहे. परंतु कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.१६/१२/२०१३ रोजी पुर्वी संपुष्टात येणार आहे. त्याकरीता मुदतवाढ मिळणेबाबत दि.१९/११/२०१३ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्ज आपले माहितीस व पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे. असे सुचित केलेले आहे.

आस्थापना कायम सुचीवरील विजतंत्री, पंपचालक , जोडारी ही पदे सद्यस्थितीमध्ये बहुतांशी रिक्त आहेत त्यामुळे मा. मॅकेनिकल इंजि.पा.पु. विभाग प्रमुख यांनी समक्ष वेळोवेळी संयुक्त बैठकामध्ये चर्चे दरम्यान पाणीपुरवठा विभाग हा नागरिकांच्या दृष्टीकोनातुन अत्यंत अत्यावश्यक सेवा असल्याने तांत्रिक कर्मचा-यांची पाणी पुरवठा विभागामध्ये कमतरता असल्याने पाणी वितरणामध्ये अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने आवश्यक त्याप्रमाणे तांत्रिक कर्मचारी तातडीने मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री व जोडारी यापदावंर सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिरातील प्रसिध्दीस देवुन (Walk In Interview) नुसार मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन उमेदवारांची निवड होवुन पात्र ठरविण्यात आलेले होते.

त्यानुसार निवड झालेल्या संबंधितांची पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार वेळोवेळी तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्या हया पाणी पुरवठा विभागामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदांवर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली होती.

| अ नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक व दिनांक | मानधनावरील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विजतंत्री | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| २ | नितीन किशोर हुशारे | विजतंत्री | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| ५ | गोरे कवि दशरथ | पंपचालक | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहामहिन्याकरीता | सदर आदेशान्वये रूजू झालेले नाहीत. |
| ६ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| ७ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६१ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |
| ८ | मुरकुटे नितीन अन्नासाहेब | जोडारी | ६०००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक १५६३ दि.१७/६/२०१३अन्वये दि.१९/६/२०१३पासुन सहा महिन्याकरीता | १८/१२/२०१३ |

दि.२५/९/२०१३ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती कार्यालय येथे मा. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक १३१ च्या दरम्यान चर्चे वेळी मा. मॅके. इंजि. विभाग प्रमुख यांनी पाणी पुरवठा विभागाकडील टेपररी तांत्रिक कर्मचा-यांना नेमणूका विषयी आवश्यक नसेल तर तसेच काम व्यवस्थित करीत नसेल तर तसा रिपोर्ट मी करील. असा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

त्यावर मा.उपायुक्त(सा.)यांनी मान्यता व आवश्यकता गृहीत धरून कर्मचा-यांना मागील तारखेपासून नेमणूक देण्यात यावी व कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.असे त्यावेळी निर्देशितकेलेले आहे.(सोबत:स्थायी समिती विषय क्र.१३१दि.२५/९/१३ इतिवृत्ताची छायांकित प्रत)

यापुर्वी पालवे संदिप गोरक्षनाथ व इतर ७ यांचा दि.१०/९/२०१२ व रोजीचा अर्जावरील मा. मॅके. इंजि.पा.पु.विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. शहर पाणी पुरवठा योजना ८१८ दि.६/१०/२०१२ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री , जोडारी या पदांवर अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्ती करीता मानधन वाढविणे निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव कडील जा.क्र. आस्था.वर्क.१४२ दिनांक १७/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यांत आलेला होता. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४९ दि.२३/१०/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री , जोडारी या पदांचे अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्ती करीता दरमहा मानधनात वाढ करणेचे प्रस्तावानुसार दरमहा मानधन रू.६०००/- वरून रू.७५००/- इतके निश्चित करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

अहमदनगर महानगरपालिकेमधील पाणी पुरवठा विभाग हा नागरिकांच्या दृष्टीकोनातुन अत्यंत तातडीने अत्यावश्यक सेवा असल्याने दि.२५/९/२०१३रोजीच्या मा. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चे दरम्यान निर्देशित केल्याच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधितांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१दि.२१/१२/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवून दि.२१/२२/२०१३पासून सहामहिन्याकरीता मा.स्थायी समितीच्या ठराव क्रमांक १४९ दि.२३/१०/२०१३ च्या पारित झालेल्या ठरावानुसार रू.७५००/- (अक्षरी रूपये सात हजार पाचशे) या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द पुर्नेनियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ७५००/- | पा.पु.विभाग |
| २ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ५ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ६ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ७ | मुरकुटे नितीन अन्नासाहेब | जोडारी | ७५००/- | पा.पु.विभाग |

तरी वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदांवर जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ६४५१ दिनांक २१/१२/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/१२/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ७५००/-(अक्षरी रूपये सात हजार पाचशे मात्र) या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :-पाणी पुरवठा विभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री व जोडारी यापदी पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.श्री. दिप चव्हाण :- आपण हे करारावर घेतले आहेत का ?

मा.सभापती साहेब :-हे त्याचेवेळी सभापती पुढे का ठेवले नाही. त्यावेळी स्थायी समिती नव्हती का त्याच वेळी मंजूरी का घेतली नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- दि.२३/१०/२०१३ रोजी ६ महिन्यासाठी मंजुरी दिलेली आहे.

मॅके.इंजि. श्री. निकम :- विळद,नागापूर,येथील पंपीगस्टेशन येथील १०९ कामगारांपैकी काही कामगार सेवा निवृत्त झाले आहे.काही कामगार मयत झाले आहेत.१०९ कामगारांपैकी सध्या ४९ कामगार शिल्लक आहेत.

मा.श्री. दिप चव्हाण :- हे पंपचालक वगैरे कोणते आहेत आपण महाराष्ट्र जीवन प्रधीकरण यांचे कडून घेतले आहेत का?

मा.सभापती साहेब :- आम्ही सांगितले होते नळ कारागीर , वॉलमन हे नगरसेवक व नागरिकांशी संबंधीत असलेल्या विषयाची निगडीत असुन ते आपण घेतले नाही.

मॅके.इंजि. श्री. निकम :- साहेब रिपोर्ट दिलेला आहे.

मा.सभापती साहेब :- श्री.नलगे हे एकच संपुर्ण शहरात काम करतात.सर्व नगरसेवक आमच्याकडे येतात,नळ फिटर व वॉलमन ताबडतोब भरा.त्याशिवाय या विषयाला मंजुरी मिळणार नाही.हा महत्वाचा विषय आहे.व दोन्ही प्रस्ताव एकत्रीत फेरसादर करा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- सध्या फक्त फिटर १ कामगार संपुर्ण शहर पहातो.

मा.श्री.सचिन जाधव :- हा विषय तहकुब ठेवा. पुढच्या स्थायी समितीला घ्या.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- वॉलमन व फिटर नेमण्याच्या प्रस्तावासह एकत्रीत फेरसादर करा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- वॉलमन व फिटर यांची अत्यंत आवश्यकता असल्याने त्वरीत नेमणुकीबाबत कार्यवाही करण्यात यावी.

मा.श्री.उमेश कवडे :- शहरातील पाईपलाईन हया अत्यंत जुन्या झालेल्या आहेत.वेळोवेळी नादुरूस्त होतात.नागरीकांच्या तक्रारीमध्ये वाढ झालेली आहे. .पाणीपुरवठयावर विस्कळीत झाल्यानंतर मागणी करून सुध्दा फिटर वेळेवर येत नाहीत.त्यामुळे फिटर व वॉलमन यांची नियुक्ती अत्यंत आवश्यक आहे.

मा.सभापती साहेब :- वॉलमनचे फिटर यांचे नेमणुकीच्या प्रस्तावासह एकत्रीत फेरसादर करा.

**ठरावः-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्तीप्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत हा प्रस्ताव आहे.तथापी पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यानंतर किंवा शहरातील पाईपलाईन हया जुन्या झालेल्या असुन त्या वारंवार नादुरूस्त होत असतात.त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असतो.त्या करीता फिटर व वॉलमन यांची आवश्यकता असुन सुध्दा वेळोवेळी सुचना देवूनही पाणीपुरवठा विभागाच्या उपरोक्त प्रस्तावामध्ये वॉलमन व फिटर यांना नेमणुका देणे बाबत कार्यवाही झालेली नाही.

तरी वरील प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा. वॉलमनचे , फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावासह पंपचालक,विजतंत्री व जोडारी यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बारेकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.उमेश कवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ६ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ६ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग दिनांक २१/९/२०१३

विनंती रिपोर्ट की, प्रा. श्री. नागयण बाबुराव मिसाळ, यांची जा.क्र.आस्था./ कंत्राटी नेमणूक १५८ दि.८/४/२०१३ अन्वये दिनांक १५/३/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रू.२००००/- एकत्रीत मुशाहि-यावर अटी व शर्तीनुसार स्पर्धा परिक्षा, प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणून तात्पुरत्या स्वरूपात नेमणूक करण्यात आलेली होती.

उपरोक्त जा.क्र.आस्था./कंत्राटी नेमणूक१५८दि.८/४/२०१३अन्वये करण्यात आलेली नेमणूकी मुदत दि.१४/९/१३ रोजी समाप्त झालेली असुन श्री.नारायण बाबुराव मिसाळ यांनी अर्ज देवून आपण संधी उपलब्ध करून दिल्यामुळे मी आपल्या मनपाने चालविलेल्या स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेपासून(२००७)या केंद्राच्या प्रकल्प संचालकपदी कार्यरत आहे.माझ्या सहा महिना अंतिम नियुक्ती पत्र जा.क्र.आस्था./कंत्राटी नेमणूक पत्र १५८दि.८/४/१३ची मुदत दि.१४/९/१३ रोजी संपत आहे. या सहा वर्षात मी या पदावर विनाखंड कार्यरत आहे. तरी या विनंती अर्जानुसार आपण मला केंद्राच्या प्रकल्प संचालक पदी पुनश्च एकवार सेवा करण्याची संधी दयावी ही विनंती. या माझ्या मागील सहा महिन्यातील कार्यकाळात आपल्या केंद्रातील सहा विद्यार्थी विक्रीकर अधिकारी तर पाच विद्यार्थी पी.एस.आय.पदी नियुक्ती झाले महाराष्ट्रात पहिला आलेला विक्रीवर अधिकारी याही वर्षा आपल्याच केंद्राचाच आहे आपणांस विदित आहेच आभारी तसदीबद्दल क्षमस्व असे नमुद केलेले आहे.

तसेच प्र.प्रसिध्दी अधिकारी यांनी श्री.मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

प्रा.श्री.एन.बी. मिसाळ हे २००७ पासून स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक म्हणून कार्यरत आहेत. आजतागायत स्पर्धा परिक्षा केंद्रामधील ब-याच विद्यार्थ्यांची यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. इत्यादी परिक्षास उत्तीर्ण होवुन विविध पदावर नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे प्रा.श्री.एन.बी.मिसाळ यांची केंद्राच्या प्रकल्प संचालक पदी नियुक्ती करणे उचित वाटते. असा अभिप्राय दिलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणूकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे

१.महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहून अधिक आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल. परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने

अशी प्रत्येक नेमणूक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यांनतर  महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणूकीचे नवीकरण करता येणार नाही.

२. पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त  नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियत्रंणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम  असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती , नगरपालिका मुख्यलेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या आधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्या कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळून शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे. तसेच श्री. मिसाळ हे सेवानिवृत्त असुन त्यांचे  वय ६० वर्षापेक्षा जास्त आहे.

सेवा निवृत्त कर्मचा-यांना/अधिका-यांना पुर्ननियुक्ती /सेवेत मुदतवाढ देण्याबाबत  मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचे  कडील क्र.आरईएम १५०९ /प्र.क्र.३५/२००९/१३ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई ४०००३२ दि.१ जून २००९ अन्वये जनहित याचिका क्र.८५/०८ सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांना पुर्ननियुक्ती / सेवेत मुदतवाढ देण्यास मा.उच्च न्यायालयाने घातलेल्या निंर्बंधाची अंमलबजावणी करणेबाबत आदेश दिलेले असुन आदेशात खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

१.कोणत्याही सेवा निवृत्त झालेल्या शासकीय अधिका-याला मा.उच्च न्यायालयाच्या पुर्व परवानगी शिवाय सेवेत मुदतवाढ देण्यास अथवा पुर्ननियुक्त करण्यास निर्बंध घालण्यात आले असल्याचे सर्व विभागांच्या निदर्शनास आणण्यात आले आहे.

२.  याबाबत विधी व न्याय विभागाने कंत्राटी पध्दतीने निवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यापुर्वी मा.उच्च न्यायालयाची पुर्व परवानगी घ्यावी असा सल्ला दिला आहे. विधि व न्याय विभागाचे सदर अभिप्राय विचारात घेता  शासन सेवेत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यास सद्यस्थितीत सामान्य प्रशासन विभागाची मान्यता दिली जाणार नाही याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घ्यावी.

सदर बाबत तत्कालीन मुख्यलेखा अधिकारी श्री. कर्डीले यांनी दि.२२/२/२०१० रोजीच्या प्रस्तावामध्ये महाराष्ट्र शासन साप्रवि/आरईएम/१५०९/प्र.क्र.३५/२००९/१३ दि.१ जून २००९ नुसार सेवानिवृत्त शासकीय कर्मचा-यास पुनर्नियुक्ती देण्यास मा.उच्च न्यायालयाने निर्बंध घातले आहे. श्री. मिसाळ हे अशासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याचे दिसुन येते त्यांना कंत्राटी पनध्दतीने एक वर्षासाठी मानधनावर नेमणूक देणे योग्य असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री.नारायण बाबुराव मिसाळ स्पर्धा परिक्षा केंद्र,संचालक यांची आस्था.जा.क्र.१५८ दि.८/४/२०१३अन्वये देण्यात आलेली तात्पुरती नेमणूक हि दि१४/९/१३ रोजी समाप्त झालेली आहे.

तरी उपरोक्त मा. सामन्य प्रशासन विभाग, यांचे कडील दि.१ जुन २००९ रोजीचे पत्राबाबत तत्कालीन मुख्य लेखा अधिकारी, यांचा अभिप्राय व प्र. प्रसिध्दी अधिकारी यांची श्री. मिसाळ यांना पुर्ननियुक्ती देणे बाबतची शिफारस पहाता. तसेच मनपामार्फत चालविलेले स्पर्धा परिक्षा केंद्र हा एक उत्तम प्रकारच्या उपक्रम असल्याने श्री नारायण बाबुराव मिसाळ यांना तांत्रिक खंड देवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद नुसार मनपामार्फत संचलीत स्पर्धा परिक्षा प्रशिक्षण केंद्रासाठी संचालक म्हणून दि.१७/९/१३ पासून सहा महिन्याकरिता कंत्राटी करार पध्दतीनी तात्पुरत्या स्वरूपात दरमहा रू.२०,०००/- एकत्रीत मुशाहि-यावर नियुक्ती देणे बाबत मुख्य लेखा परिक्षक व मुखलेखाधिकारी यांचा अभिप्राय घेवुन तसे नियुक्ती आदेश निर्गमित करून सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर करणे उचित वाटते.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मु.ले.प. / मु.ले.अ. यांचा अभिप्राय घेणे

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे नियुक्ती आदेश देण्यास व सदर प्रस्ताव कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यास हरकत नसावी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा. आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, अ नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कार्योत्तर मंजुरी आहे का ? मंजुरी देण्यात यावी.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- आफिस रिपोर्ट मंजुर करावा.

मा.श्री.सभापती साहब :- ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद कार्योत्तर मंजूरी असल्याने ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**ऑफिस रिपोर्ट नुसार श्री. नारायण बाबुराव मिसाळ यांची अहमनगर महानगरपालिकेचे स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र. आस्था/ कंत्राटी नेमणूक ७७३० दि.१३/२/२०१४ अन्वये दि.१७/९/२०१३ पासुन सहा महिन्याकरिता दरमहा रू.२०,०००/-या मानधनावर केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ७ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ७ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन२०१३-२०१४या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस दैनंदिन दुरूस्तीकामी लागणारे इलेक्ट्रीक साहित्य उदा.४०वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर ,चोक,टयुब पट्टी,१५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर कॉपर केबल, वायर,फॅन,मोटारपंप, मेनस्वीच स्टार्टर,फ्युज,यु.पी.एस. टयुबलर बॅटरी इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा स्टोअर विभाग दि.२८/२/२०१४

विनंती रिपोर्ट की, सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस दैनंदिन दुरुस्तीकामी लागणारे इलेक्ट्रीक साहित्य उदा.४० वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर,चोक,टयुब पट्टी, १५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर,कॉपर केबल,वायर,फॅन,मोटर पंप,मेनस्वीच स्टार्टर,फ्युज, यु.पी.एस, टयुबलर बॅटरी इ.साहीत्य पुरवण्यासाठी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक:मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन फेर जाहिर टेंडर नोटीस(प्रथम वेळ)प्रसिध्द करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१)मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई.
२)मे.दि.न्युट्रॉन इलेक्ट्रिकल्स,मुंबई.
३)मे.जय इंम्पेक्स,मुंबई.

यापमाणे तीन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे)लिफाफे उघडण्यात येवून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता -

अ.क्र.-१ ते ७६ चे इलेक्ट्रिक साहित्याचे दर मे.अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

अ.क्र.-१ ते ७६ चे साहित्याचे DSR दर नमुद करणेसाठी निविदा दराचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.स्टोअर विभाग-९६ दि.२९/०८/२०१३ अन्वये मा.इलेक्ट्रिक विभाग प्रमुख,अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस पाठविला असता त्यांनी निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम क्र.१० मध्ये सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील उपलब्ध DSR दरसुचीतील दर नमुद करुन सदरचा तुलनात्मक तक्ता जा.क्र.इलेक्ट्रिक विभाग - ४५६ दि.०६/०१/२०१४अन्वये स्टोअर विभागाकडे पाठविलेला आहे.

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता -

अ.क्र.- ४,८,२८ ते ३१,५६,५९ ते ६०,६२ ते ७६ चे DSR दर उपलब्ध नाहीत परंतु इलेक्ट्रिक विभाग प्रमुख यांनी मंजुरी करणेबाबतचा अभिप्रेत दर नमुद करुन दिलेला आहे.

अ.क्र.-१३,३६ते ३९चे निविदेतील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमीचे प्राप्त दर व DSR दर समान आहेत.

अ.क्र.- १,५,१५ ते १६,२० ते २१,२३ ते २६,४५ ते ४८,५१,५७ ते ५८ व ६१ चे दर DSR दरापेक्षा कमी आहेत.

अ.क्र.- २,३,६ ते ७,९ ते १२,१४,१७ ते १९,२२,२७,३२ ते ३५,४० ते ४४,४९ ते ५०,५२ ते ५५ चे दर DSR दरापेक्षा जास्त आहेत.

स्पर्धात्मकदृष्टया कमीचे निविदा दर धारक अर्हम एंटरप्राईज,मुंबई यांना जा.क्र.स्टोअर विभाग-२२० दि.०५/०२/२०१४ अन्वये निविदा दर वाटाघाटीसाठी मा.प्रशासकिय निविदा छानणी समिती बैठकीत समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविले असता ते समक्ष उपस्थित राहून त्यांनी निविदा दर निगोसिएशन वेळी झालेल्या समक्ष चर्चेनुसार

**१)**DSR दर उपलब्ध नसलेले अ.क्र.४,८,२८ ते ३१,५६,५९ ते ६० व ६२ ते ७६ चे विद्युत साहित्य इलेक्ट्रिक सुपरवायझर यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे.

**२)**DSR व निविदेतील दर समान असल्याने अ.क्र.१३ व ३६ ते ३९ चे विद्युत साहित्य निविदेमध्ये दिलेल्या दराने.

**३)**DSR दरापेक्षा कमी असलेले अ.क्र.१,५,१५ ते १६,२० ते २१,२३ ते २६,४५ ते ४८,५१, ५७ ते ५८ व ६१ चे विद्युत साहित्य निविदेमध्ये नमुद केलेल्या दराने.

**४)**DSR दरापेक्षा किमान १०% पर्यंत अधिक दर असणारे अ.क्र.२,३,९ ते १२,१७ ते १९,२७,३२,३४ ते ३५,४२,४९ ते ५०,५२ व ५५ चे विद्युत साहित्य निविदेमध्ये नमुद केलेल्या दराने.

**५)**DSR दरापेक्षा किमान १०% पासून कमाल मर्यादेपर्यंत अधिक दर असणारे अ.क्र.६ ते ७,१४,२२,३३,४० ते ४१,४३ ते ४४ व ५३ ते ५४ चे विद्युत साहित्य DSR दरापेक्षा १०% अधिक दराने पूरवठा करण्याचे मान्य केले असून तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे (सदरचे दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.११ मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत) सदरचे वार्षिक निविदा दर मंजुर करणेबाबत शिफारस प्रशासकिय निविदा छानणी समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.११ मध्ये नमुद करण्यात आलेल्या दरास तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.१२/०२/२०१२ रोजीचे प्रस्तावावर

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी " प्रस्तावित 'अ' प्रमाणे मान्यतेस्तव सादर",

मा.प्र.उपायुक्तसाहेब(कर) यांनी " 'अ' प्रमाणे मान्यतेस्तव सादर",

मा.आयुक्तसाहेब यांनी " 'अ' नुसार मान्य" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

तरी मा.प्रशासकिय निविदा छानणी समितीने केलेल्या शिफारसी प्रमाणे निविदाकार यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेले(निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यात कॉलम नं.११ मध्ये नमुद) वार्षिक निविदा दरास मंजुरी मिळावी हि विनंती.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

**सोबत -** वार्षिक निविदा दर मंजुरीस्तव सादर केलेल्या विदयुत साहित्याची यादी पान नं. १ ते ५ येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

**निविदाकार - अर्हम एंटरप्राईज, मुंबई.**

| अनं. | मालाचा तपशील | परिमाण | निगोसिएशन नंतर दिलेले अंतिम निविदा दर रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ४ फुट ४० वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ४६=०० |
| २ | ट्युब लॉक होल्डर (ब्रॉस कॉन्टॅक्ट)<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १२=०० |
| ३ | ४० वॅट ट्युब स्टार्टर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ११=५० |
| ४ | ४ फुट ट्युब पट्टी चोक स्टार्टरसह कप्लींट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ३१६=०० |
| ५ | १५० वॅट सोडीयम बल्ब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ५७०=०० |
| ६ | १५० वॅट सोडीयम चोक<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | ८१९=०० |
| ७ | १५०/२५० वॅट सोडीयम इग्नेटर<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो/बजाज | प्रती १ नग | १९२=०० |
| ८ | १५० वॅ्ट मर्क्युरी थ्रेड टाईप होल्डर | प्रती १ नग | ८८=०० |
| ९ | सिलिंग फ़ॅन ५६" संपूर्ण असेसरीजसह<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | १७१५=०० |
| १० | पेडस्टल फ़ॅन १६"<br>उषा / ओरिएण्टल /बजाज कंपनी | प्रती १ नग | २५९५=०० |
| ११ | टेबल फ़ॅन<br>उषा /क्रॅाम्प्टन | प्रती १ नग | १९१०=०० |
| १२ | ४ फुट ४० वॅट स्ट्रीट लाईट फ़िंटीग<br>कप्लीट ट्युबसह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १२२५=०० |
| १३ | १५० वॅ्ट सोडीयम व्हेपर कप्लीट फ़िटीग<br>बल्ब्सह<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | ३७७२=०० |
| १४ | जी.आय तार नं. १४ | प्रती १ किलो | ९२=०० |
| १५ | फ़ायबर ड्युम हंडी १२ " फ़ायबर प्लास्ट | प्रती १ नग | ६६५=०० |
| १६ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर १.५ टन क्षमता<br>व्होल्टेज स्टॅबीलायझरसह<br>एल.जी / ब्ल्यु स्टार /पॅनासॉनिक | प्रती १ नग | ४३०२०=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | स्प्लीट टाईप एअर कंडीशनर २ टन क्षमता<br>व्होल्टेज स्टॅबीलायझर एल.जी / ब्ल्यु<br>स्टार/पॅनासॉनिक | प्रती १ नग | ५८७००=०० |
| १८ | सी.एफ़.एल. १८ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | २१५=०० |
| १९ | सी.एफ़.एल.११ वॅट<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | १५५=०० |
| २० | लोखंडी ब्रॅकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ३ फ़ुट २५ MM | प्रती १ नग | ३३५=०० |
| २१ | लोखंडी ब्रॅकेट बी ग्रेड जी आय पाईप<br>साईज - ५ फ़ुट ४० MM | प्रती १ नग | ४७५=०० |
| २२ | लोखडी क्लॅम्प<br>५" X ३" नटबोल्ट सह | प्रती १ नग | २८५=०० |
| २३ | २.५ एम एम २ कोअर सर्व्हिस वायर<br>३०० फ़ुट - ISI मार्क - नामांकित कंपनी | प्रती १ बंडल | १२६०=०० |
| २४ | १ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | ८३५=०० |
| २५ | २.५ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | १८४०=०० |
| २६ | ४ Sq.mm पी.व्ही.सी कॉपर केबल<br>३०० फुट - ISI मार्क<br>नांमाकिंत कंपनी | प्रती १ बंडल | २९६०=०० |
| २७ | पी.एल.३६ वॅट ट्युब<br>क्रॉम्प्टन / फ़िलिप्स /विप्रो | प्रती १ नग | २१५=०० |
| २८ | १ एच.पी.सबमर्शीबल सिंगल फ़ेज मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर | प्रती १ नग | १४४००=०० |
| २९ | ५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २२२३७=०० |
| ३० | ७.५ एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन /टेक्स्मो / लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २९६५०=०० |
| ३१ | १० एच.पी.ओपनवेल (पाणबुडी ) मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी<br>/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३०२८२=०० |
| ३२ | ५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो /लुबी /बीबीसी /किर्लोस्कर<br>/नामांकित कंपनी | प्रती १ नग | २३५००=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | ७.५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन/टेक्स्मो/लुबी<br>/बीबीसी/किर्लोस्कर/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३०२६८=०० |
| ३४ | १० एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी /बीबीसी<br>/किर्लोस्कर/विप्रो | प्रती १ नग | ३६६३०=०० |
| ३५ | १५ एच.पी. मोनोब्लॉक मोटर पंप<br>क्रॉम्प्टन / टेक्स्मो / लुबी<br>/बीबीसी/किर्लोस्कर/विप्रो/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ४७१५०=०० |
| ३६ | ५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७५५=०० |
| ३७ | ७.५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७५५=०० |
| ३८ | १० एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | १७५५=०० |
| ३९ | १५ एच.पी. स्टार्टर<br>एल.टी एल.के/ नांमाकित कंपनी | प्रती १ नग | ५२९८=०० |
| ४० | ४ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर कॉपर<br>सबमर्शीबल केबल. ISI मार्क | प्रती १ मिटर | ९५=०० |
| ४१ | २.५ स्क्वेअर एम.एम. x ३ कोअर<br>कॉपर केबल. ISI मार्क | प्रती १ मिटर | ९८=०० |
| ४२ | मेन स्वीच थ्री फ़ेज ६३ A<br>स्टेनले कंपनी /नामांकित कंपनी | प्रती १ नग | २५५०=०० |
| ४३ | १०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ५३७९=०० |
| ४४ | २०० ॲम्पीयर ३ फ़ेज मेनस्वीच<br>स्टेनले कंपनी/नामांकित कंपनी | प्रती १ नग | ७१३०=०० |
| ४५ | ३२ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | १४५=०० |
| ४६ | ६३ ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ३१५=०० |
| ४७ | १०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ५८५=०० |
| ४८ | २०० ॲम्पीयर बेस व टॉप फ़्युज<br>नामांकित कंपनी | प्रती १ नग | ११६०=०० |
| ४९ | ६५० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ८४८०=०० |
| ५० | ७५० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ८४८०=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५१ | ८०० व्ही.ए.यु.पी.एस. १२ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | ११३६०=०० |
| ५२ | १४०० व्ही.ए.यु.पी.एस. २४ व्होल्ट<br>कंपनी स्वस्तिक / बजाज /विप्रो | प्रती १ नग | १४४००=०० |
| ५३ | १५० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी - मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /<br>ओकाया / एक्साईड. | प्रती १ नग | २१०८७=०० |
| ५४ | २०० ॲम्पिअर ट्युबलर बॅटरी<br>कंपनी - मायक्रोटेक्स / एस.एफ़ स्टॅन /ओकाया<br>/ एक्साईड. | प्रती १ नग | २१६१८=०० |
| ५५ | T- ५ २८ वॅट ४ फ़ुटी ट्युब<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | १४५=०० |
| ५६ | डी.ओ.फ़्युज लिंक ३३ के.व्ही. | प्रती १ नग | ६३=००<br>५/१०ˑAMP<br>१५५=००<br>१६/६३ AMP |
| ५७ | ४० वॅट इलेक्ट्रॉनिक्स चोक<br>कंपनी क्रॉम्प्टन /फ़िलिप्स/विप्रो | प्रती १ नग | २५५=०० |
| ५८ | १५० वॅट डबल एन्डेड मेटल हॅलाईड टयुब<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | ६७५=०० |
| ५९ | रबर हॅण्डग्लोज ३३००० व्होल्ट<br>३३ के.व्ही. | प्रती १ जोड | ७५०=०० |
| ६० | टेप बंडल १० मीटर<br>ॲकर /स्टील ग्रिप | प्रती १ नग | १२=०० |
| ६१ | ४०० वॅट मेटल हॅलाईड टयुब<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | १३६०=०० |
| ६२ | ४०० वॅट मेटल हॅलाईड चोक<br>कॉम्प्टन कंपनी | प्रती १ नग | १९००=०० |
| ६३ | १०० AMP कॉपर फ्युज वायर | प्रती १ किलो | १२९६=०० |
| ६४ | टपारिया टेस्टर ८१३ | प्रती १ नग | ४५=०० |
| ६५ | टपारिया पक्कड इले. १६२७/८ | प्रती १ नग | २०२=०० |
| ६६ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२५ | प्रती १ नग | ५७=०० |
| ६७ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८२४ | प्रती १ नग | ५४=०० |
| ६८ | टपारिया स्क्रू ड्रायव्हर स्लीव्हसह ८८३५ | प्रती १ नग | ४५=०० |
| ६९ | टपारिया क्रॉसपीन हॅमर १/२ kg | प्रती १ नग | २२६=०० |
| ७६ | लेदर सेफ्टि शूज विथ स्टील टो | प्रती १ जोड | ६७५=०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७० | टपारिया स्पॅनर सेट | प्रती १ सेट | २४७=००<br>६/२२<br>६४८=००<br>६/३२ |
| ७१ | ड्रिल मशिन ब्लॅक अॅण्ड डेकर मेक १२mm | प्रती १ नग | २५७५=०० |
| ७२ | इन्डस्ट्रियल सेफ्टि इलेक्ट्रिक हॅण्ड ग्लोव्हज | प्रती १ जोड | ६०८=०० |
| ७३ | टॉग टेस्टर | प्रती १ नग | २७५४=०० |
| ७४ | इव्हररेडी एल.ए.डी.बॅटरी | प्रती १ नग | २९७=०० |
| ७५ | इलेक्ट्रिक बेल / रेमोट बेल | प्रती १ नग | १०५=०० / इलेक्ट्रिक बेल<br>५०८=००/ रिमोट बेल |

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- सन२०१३-२०१४या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस दैनंदिन दुरूस्तीकामी लागणारे इत्यादी साहित्य खरेदी मागविणेस मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- मागच्या आठवडयातले अंदाजपत्रक कोणते ?

इलेक्ट्रीक प्रमुख श्री. बाळासाहेब सावळे :- सन २०१४-२०१५ चे

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- मग मागची खरेदी कोणत्या दराची होती.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे व मा.श्री. दिप चव्हाण :- सन २०१३-२०१४ ला मान्यता व सन २०१३-२०१४ ला परत मान्यता कशी

मा.सभापती साहेब :- सन २०१३-१४ ला व सन २०१२-१३ च्या दराला आता कशी मान्यता घेता.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हा माल घेतला का

मा.श्री.दिप चव्हाण :- सन २०१३-२०१४ च्या दराशी आमचा संबंध कसा ते सांगा.

मा.श्री. दिप चव्हाण :- ऑफिसचे मत काय आहे ते समजू द्या सन २०१३-१४ चे दर आता का आणले अकौंटंट,चिफ ऑडिटर सांगा.

मा.सभापती साहेब :- फाईल साहेबांना दाखवा.

मा.श्री.दिप चव्हाण :-तुमचा नियम काय म्हणतो ज्या त्या आर्थिक वर्षात मान्यता व्हायला पाहिजे का नको.

मा.सभापती साहेब :- ज्या वर्षात साहित्य खरेदी केले ते रेट असायला हवे की नाही.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- रेटची मंजुरी झालेली आहे.CFL ची दर २१५रू.दिला आहे. मी आता विचारले तर १४५ रू. ३६ वॅटची टयुब दुकानदाराने सांगीतले.

मा.सभापती साहेब :- दरामध्ये इतकी तफावत का ?

स्टोअर प्रमुख श्री. जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचा.

मा.श्री.दिप चव्हाण :- मी तेच म्हणतो ऑडीट व मुख्यलेखापरिक्षक यांचा काय रिपोर्ट आहे. यात सन २०१२-१३ व २०१३-१४ गेले ते यावर्षी मंजूर करता येईल ते सांगा.

इलेक्ट्रीक प्रमुख श्री. बाळासाहेब सावळे :- सन २०१४-१५ चे ही ठेवले आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- मग फ्रेश ठेवा ना रिपोर्ट सांगा.

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे :- सन २०१३-१४ ची निविदा प्रक्रिया अवलंविली व त्यानंतर आलेल्या निविदा या स्थायी समिती पुढे आहेत.

मा.श्री.दिप चव्हाण :- ऑडीट व मुख्यलेखापरिक्षक चे अभिप्राय सांगा.

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे :- तत्कालीन मुख्यलेखापरिक्षक शेरा दिला.

मा.श्री. दिप चव्हाण :-मी हे विचारतो की हे आज मंजूर करता येते का ?

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे :- DSR नंतर आले आहेत.

मा.सभापती साहेब :- हे रेट बाळासाहेब बोराटे नी सांगितले ते १ तासापुर्वीचे आहेत हे फार कमी आहेत तुम्ही या शहरातील डिलर ला विचारलो का ?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-मान्यता देंवू नका पेडींग ठेवा. सन २०१४-१५ च्या दरानुसार फेरसादर करा.

मा.श्री. दिप चव्हाण :- ज्या त्या वर्षांची मंजूरी त्या त्या वर्षात द्यावी हे बरोबर आहे का हे सांगा त्यांनी फेरप्रस्ताव सादर करा.

मुख्यलेखापरिक्षक श्री. अनारसे :- सन २०१४-१५ च्या दरानुसार फ्रेश सादर करावे.

मा.श्री.सचिन जाधव :- आतापर्यन्त पालिकेने एकही टयूब बसवीली नाही.हा विषय रदद करावा.

मा.श्री. दिप चव्हाण :- संपूर्ण रद्द करा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावात सादर केलेले दर हे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील असल्याने सन २०१४-१५ च्या दरानुसार फेरसादर करा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेचे सन२०१३-२०१४या आर्थिक वर्षाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस दैनंदिन दुरूस्तीकामी लागणारे इलेक्ट्रीक साहित्य उदा.४०वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर ,चोक,टयुब पट्टी,१५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर कॉपर केबल, वायर,फॅन,मोटारपंप, मेनस्वीच स्टॉटर,फ्युज,यु.पी.एस. टयुबलर बॅटरी इत्यादी साहित्य खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील निर्णय घेण्यात येत आहे.

प्रस्तावात सादर केलेले दर हे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षातील असल्याने हा प्रस्ताव रद्द करून सन २०१४-१५ च्या दरानुसार फेरसादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सचिन जाधव सही /-

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.

## मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २

विषय क्रमांक-८ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ८ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना जा.क्र./वर्क. ३ दिनांक ३/४/२०१४

विनंती की, आस्थापना कायम सुचीवरील विजतंत्री, पंपचालक, जोडारी ही पदे सद्यस्थितीमध्ये बहुतांशी रिक्त आहेत त्यामुळे मा. मॅकेनिकल इंजि.पा.पु. विभाग प्रमुख यांनी समक्ष वेळोवेळी संयुक्त बैठकांमध्ये चर्चे दरम्यान पाणी पुरवठा विभाग हा नागरिकांना दृष्टीकोनातून अत्यंत अत्यावश्यक सेवा असल्याने तांत्रिक कर्मचा-यांची पाणी पुरवठा विभागामध्ये कमतरणा असल्याने पाणी वितरणामध्ये अनेक तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने आवश्यक त्याप्रमाणे तांत्रिक कर्मचारी तातडीने मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, जोडारी यापदांवर सहा महिन्याकरीता अटी व शर्ती नुसार दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता वेळोवेळी वर्तमान पत्रामध्ये जाहिरातील प्रसिध्दीस देवुन (Walk In Interview) नुसार मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन उमेदवारांची निवड होवुन पात्र ठरविण्यात आलेले होते.

त्यानुसार निवड झालेल्या संबंधितांची पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक पदांवर अटी व शर्ती नुसार वेळोवेळी तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्त्या हया पाणी पुरवठा विभागामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संबंधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदांवर अटी व शर्तीप्रमाणे तांत्रिक खंड देवुन सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक व दिनांक | मानधना वरील केलेल्या करारबध्दाची पुर्ननियुक्तीची मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | महेश बाळासाहेब कुळधर | पंपचालक | ७५००/- | जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०४ दि.४/१०/२०१३अन्वये दि.१८/९/२०१३ पासुन सहा महिन्या करीता तसेच जा.क्र.आस्था.७८४१ दि.२०/२/२०१४ अन्वये रू.७५००/- मानधन वाढीबाबत | १७/०३/२०१४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ७५००/- | ---//--- | १७/०३/२०१४ |
| ३ | राकेश गोरक्षनाथ तेलारे | पंपचालक | ७५००/- | ---//--- | १७/०३/२०१४ |
| ४ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ७५००/- | ---//--- | १७/०३/२०१४ |
| ५ | प्रसाद मुरलीधार हातवळणे | विजतंत्री | ७५००/- | ---//--- | १७/०३/२०१४ |

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदांवर अटी व शर्ती प्रमाणे संबंधीतांची जा.क्र. आस्था. / कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०४ दि.०४/१०/२०१३ अन्वये तांत्रिक खंड देवून दिनांक १८/०९/२०१३ पासुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव हा स्थायी समितीकडे जा.क्र. आस्था./ वर्क. १३९ दिनांक १७/१०/२०१३ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४६ दिनांक २३/१०/२०१३ अन्वये ठराव पारित करून सदर केलेल्या कंत्राटी करारबध्द कालावधीतील पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

दिनांक २५/०९/२०१३ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती कार्यालय येथे मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये विषय क्रमांक १३१च्या दरम्यान चर्चे वेळी मा. मॅकेनिकल इंजि. पा.पु. विभाग प्रमुख यांनी पाणी पुरवठा विभागाकडील टेपररी तांत्रिक कर्मचा-यांच्या नेमणूका विषयी आवश्यक आवश्यक नसेल तर तसेच काम व्यवस्थीत करीत नसेल तर तसा रिपोर्ट मी करील. असा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

त्यावर मा.उपायुक्त (सा.) यांनी मान्यता व आवश्यकता गृहीत धरून कर्मचा-यांना मागण्या तारेखापासून नेमणूका देण्यात यावी व कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा असे त्यावेळी निर्देशित केलेले आहे. **(सोबत : मा.स्थायी समिती विषय क्र.१३१ दि.२५/९/२०१३ ची इतिवृत्ताची छायांकित प्रत)**

अहमदनगर महानगरपालिके मधील पाणी पुरवठा विभाग हा नागरिकांच्या दृष्टीकोनातुन अत्यंत तातडीने अत्यावश्यक सेवा असल्याने दिनांक २५/९/२०१३ रोजीच्या मा.स्थायी समिती कार्यालयामध्ये मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चे दरम्यान मा. उपायुक्त (सा.) यांनी निर्देशित केल्याच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची कंत्राटी कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या पदी जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द ८०९२ दिनांक ४/३/२०१४ अन्वये तांत्रिक खंड देवून दिनांक २०/३/२०१४पासून सहा महिन्याकरीता मा.स्थायी समितीच्या ठराव क्र.१४९ दिनांक २३/१०/२०१३ च्या पारित झालेल्या ठरावानुसार रू.७५००/- (अक्षरी रूपये सात हजार पाचशे ) या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | महेश बाळासाहेब कुळधर | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| २ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ३ | राकेश गोरक्षनाथ तेलारे | पंपचालक | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ४ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ७५००/- | पा.पु.विभाग |
| ५ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | ७५००/- | पा.पु.विभाग |

तरी वरील तक्त्यात दर्शविलेल्यांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या तांत्रिक पदांवर तंत्रिक खंड देवुन दिनांक २०/०३/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये ७५००/-(अक्षरी रूपये सात हजार पाचशे मात्र) या मानधनावर जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ८०९२ दिनांक ४/३/२०१४ अन्वये केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीपुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापनाप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठाविभाग कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री यापदी पुर्नेनियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हा विषय रद्द करा. वॉलमन व फिटर यांचे नियुक्ती च्या प्रस्तावासह हा प्रस्ताव सादर करा. पुढच्या सभेत फेरसादर करा.

मा.श्री.कुमार वाकळे :- हा विषय रदद करून वॉलमन व फिटर यांचे नियुक्ती च्या प्रस्तावासह पुढच्या सभेत फेरसादर करा.

मा.श्री.सचिन जाधव :- हा विषय रद्द करा. पंपचालक,विजतंत्री, यांचे बरोबरच वॉलमन व फिटर यांचे नियुक्तीचे प्रस्तावासह पुढच्या स्थायी समितीला घ्या.

मा.सभापती साहेब :- हा विषय रद्द करा.पंपचालक,विजतंत्री,यांचे प्रस्तावाबरोबर सादर करा वॉलमन व फिटर यांचे नियुक्ती च्या प्रस्तावासह हा प्रस्ताव सादर करा. पुढच्या सभेत फेरसादर करा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी बाबत.

उपनगरातील पाणीपुरवठा विस्कळीत झाल्यानंतर व शहरातील पाईपलाईन हया जुन्या झालेल्या असुन त्या वारंवार नादुस्त होत असतात.त्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असतो.त्या करीता फिटर व वॉलमन यांची आवश्यकता असुन सुध्दा उपरोक्त प्रस्तावामध्ये वेळोवेळी मागणी केली असतांना या बाबत कार्यवाही झालेली नाही.

तरी वरील प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा. वॉलमनचे , फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावा सोबत पंपचालक,विजतंत्री यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा,
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.सचिन जाधव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ९ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ९ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य व माल जरूरी प्रमाणे खरेदीकामी ई- निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करून वार्षिक निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा स्टोअर विभाग दि.२९/४/२०१४

संदर्भ - मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१०

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षा करिता प्रभाग समिती क्र.१ ते ४,पाणी पुरवठा विभाग,आरोग्य विभाग,सार्व.बांधकाम विभाग,इलेक्ट्रिक विभाग,उदयान विभाग व इतर सर्व विभागांना लागणारे साहित्य/माल कार्यालयीन स्टेशनरी तसेच सर्व मनपा दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी औषधे,रसायने,वैद्यकिय साहित्य,उपकरणे इत्यादी जरुरीप्रमाणे खरेदी करण्यासाठी वार्षिक निविदा दर करार करणेसाठी मालाचे संपूर्ण तपशील व परिमाणासह माहिती संबंधित खाते प्रमुखांकडून मागविली असून त्यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे स्वतंत्र निविदा गट तयार करण्यात आलेले आहेत.

अंदाजे वार्षिक खरेदी किंमत विचारात घेवून महाराष्ट्र शासन उदयोग ऊर्जा व कामगार विभाग मा.शासन निर्णय क्र.भांखस २००२/(२९९७)/उदयोग-६ मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.२८ मार्च २००३ अन्वये कॉलम नं.५ मध्ये को-या निविदासंचाची किंमत नमुद केलेली आहे.

| अ. क्र | मालाचा तपशील | अंदाजे लागणा-या मालाची किमंत | निविदा बयाणा रक्कम | निविदा संच किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ISI मार्क MJP प्रमाणीत, स्लुईस व्हाल्व, PVC पाईप व तद्संबंधी लागणारी फ़िटींग, बोअरीग दुरुस्ती साहीत्य,SKF कंपनीच्या बेअरींग इ. | १५,००,०००/- | १५,०००/- | २,०००/ |
| २ | ॲलम(तुरटी) ग्रेड-I (ब्लॉक),ब्लिचिंग (TCL) पावडर ग्रेड-I, लिक्वीड क्लोरिन गॅस ९००किलो सिलेंडर. | १५,००,०००/- | १५,०००/- | २,०००/- |
| ३ | जंतुनाशक द्रव्ये,पावडर उदा.डी.डी.व्ही.पी. ७६% इ.सी.,टेमिफॉस ५०% ई.सी., बायोलार्व्हीसाईड (बी.टी.आय.)लिक्विड,बायोलार्व्हीसाईड (बी.टी.आय.)पावडर,पायरेथ्रम एक्सट्रॅक्ट २%,मलेरिया,लार्व्हीसाईडल(एम.एल.ओ.)ऑईल,नॅप सॅक्फ्रवारणी पंप, फॉगींग मशिन,प्रिमिफॉस | १०,००,०००/- | १०,०००/- | २,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | मिथाईल,नॅचरल पेस्टिसाईड/बायोकल्चर पावडर,.,नॅचरल पेस्टिसाईड/ बायोकल्चर लिक्विड, कार्बो-फेनॉल पावडर-सफेद रंगाची,हायड्रो-क्लोरिक ॲसिड एन/३०,ब्लॅक फिनेल,सेंटेड फिनेल इ. | | | |
| ४ | महानगरपालिका दवाखान्यासाठी व रक्तपेढीसाठी लागणारी सर्व प्रकारची औषधे, रसायने, व वैद्यकिय साहीत्य , उपकरणे इत्यादी. | ५०,००,०००/- | ५०,०००/- | २,०००/- |
| ५ | लोखंडी पहार,प्लॅस्टीक फायबर घमेले,लोखंडी घमेले,उंदराचे व घुशीचे पिंजरे,गॅल्व्हनाईज बादली,लोखंडी टिकाव, खोरे, दांडे, लोखंडी फावडी, हॅन्ड ग्लोव्हज,गमबुट,रबरी होज पाईप,बांगडी पाईप, गार्डन कातरी,ताडपत्री,लोखंडी पत्रा,लोखंडी पट्टी,वेल्डींग रॉड, जी.आय.पाईप B क्लास, नारळी खराटे,पंखाटाईप गोलाकार झाडू,मोलाचे कुंचे इ. | ५,००,०००/- | ५,०००/- | ७५०/- |
| ६ | फायबर डस्टबीन(अनब्रेकेबल),लोखंडी कचरा ढकलगाडी,हेवी डयुटी मेटॅलिक हॅण्ड कार्ट,लोखंडी ट्री गार्ड,प्रोव्हायडिंग ॲण्ड फिक्सिंग डिलक्स बेंच,फायबर बेंच, एम.एस.बेंच,प्रोव्हायडिंग ॲण्ड फिक्सिंग फायबर वाचनालय | १५,००,०००/- | १५,०००/- | २,०००/- |
| ७ | खडी,डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी, सिमेंट, राळा, चाळलेली वाळू, पोयटा माती, शहाबाद फरशी, हार्डमुरुम, सॉप्टमुरुम, तांबड्या विटा, लालमाती, लोखंडी सळया,लोखंडी ॲंगल,वेल्डींग मेश जाळी, प्रिकास्ट आर.सी.सी.स्लॅब,सिमेंटचे मेनहोल कव्हर्स फ्रेमसह, सिमेंट मोझॅक बेंचेस पाठीसह,एन.पी.२ क्लास हयुम पाईप कॉलरसह इ. | ५०,००,०००/- | ५०,०००/- | २,०००/- |
| ८ | इलेक्ट्रीक साहित्य उदा.४० वॅट टयुब, स्टार्टर,लॉक होल्डर,चोक,टयुब पट्टी, १५० वॅट सोडीयम बल्ब,सोडीयम चोक, इग्नेटर,कॉपर केबल,वायर फॅन,मोटर पंप, मेनस्वीच स्टार्टर,फ्युज,यु.पी.एस, टयुबलर बॅटरी इ. | ४०,००,०००/- | ४०,०००/- | २,०००/- |
| ९ | कार्यालयीन व संगणक स्टेशनरी साहित्य - उदा.पांढरा कागद,क्वॉयर रजिष्टर, डुप्लीकेट बुक, फाईल्स्, डिंक,कार्बन पेपर, स्टॅम्प पॅड, टॅग, टाचनी, सुतळी, कुलूप, कार्टेज टोनर, रिबीन, फ्लॉपी, कॅल्क्युलेटर,स्टेनो डायरी, संगणक पेपर इ. | ७,००,०००/- | ७,०००/- | १,०००/- |
| १० | ऑफिस फर्निचर स्टील,फायबर व लाकडी उदा.लहान मोठे कपाट,रॅक,ऑफिस टेबल, केनिंग चेअर,फायबर चेअर,कॉम्प्युटर टेबल,प्रिंटर टेबल,रिव्हॉल्वींग चेअर, व्हील चेअर,स्टेनलेस स्टिल टु सिटर व थ्री सिटर इ. | ३,००,०००/- | ३,०००/- | ७५०/- |

तरी उपरोक्त प्रमाणे अ.क्र.१ ते १० चे स्वतंत्र गट करुन निविदा मधील अटी शर्तीनुसार दोन लिफाफे पद्धतीने वर्तमानपत्रात तसेच मनपा नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिद्ध करुन मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई -४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन वार्षिक निविदा दर मागविणेस व निविदा जाहिरात प्रसिद्धीकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.२९/०३/२०१४ चा प्रस्तावावर -

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "उद्योग उर्जा कामगार विभाग,शा.नि.दि.२ जानेवारी १९९२ नुसार मागील शिल्लक साठा विचारात घेवून मागणी प्रमाणे फेर प्रस्ताव सादर करणेउचित होईल"

मा.उपायुक्तसाहेब(कर) यांनी "उपरोक्त नुसार फेर सादर करावे"असा स्टोअर विभाग प्रमुख यांना आदेश देवून स्वाक्षरी केलेली आहे.

त्यानुसार स्टोअर विभाग दि.०९/०४/२०१४ चा फेर प्रस्ताव सन २०१४-१५ या आर्थिक वर्षा करिता जरुरीप्रमाणे लागणारे दैनंदिन साहित्याचे वार्षिक दर करार करणेसाठी आवश्यक साहित्याची यादी संपूर्ण मालाचे तपशीलासह संबंधित खातेप्रमुख व शाखाप्रमुख यांचेकडून जा.नं.स्टोअर विभाग-२२५ दि.१५/०२/२०१४ अन्वये माहिती मागविली असता प्राप्त झालेल्या माहितीनुसार ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन वार्षिक निविदादर मागविणेस मंजुरी मिळणेबाबत स्टोअर विभाग दि.२९/०३/२०१४ चा प्रस्ताव सादर केलेला आहे.

प्रस्तावित निविदा संख्या करार करणेसाठी मागविण्यात येणार नाहीत.वार्षिक निविदा दर करार मंजुरीनंतर सन२०१४-१५या आर्थिक वर्षात जरुरीप्रमाणे लागणारे दैनंदिन साहित्य खरेदीकामी संबंधित विभागामार्फत मागणी प्रस्ताव सादर करण्यात येवून खरेदी सक्षम प्राधीकरणाची खर्चास मंजुरी घेवून खरेदीवेळी मागील शिल्लक साठा विचारात घेवून जरुरी व आवश्यकतेप्रमाणे खरेदी केली जाते

तरी स्टोअर विभाग दि.२९/०३/२०१४ चे प्रस्तावान्वये मंजुरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.याप्रमाणे सादर केला असता त्यावर -

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी " T-४ परि 'अ' स्थित प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नाही"

मा.उपायुक्तसाहेब(कर) यांनी " सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात विविध विभागांना लागणारे साहित्य खरेदी करणेकामी विविध १० गटांत नमुद साहीत्य खरेदी करणेसाठी आवश्यक ते दरपत्रक मागविणेस हरकत नाही. अ नुसार आदेशार्थ स.सादर" असा अभिप्राय दिलेला असून मा.आयुक्तसाहेब यांनी दि.२९/०४/२०१४ रोजीची सहमती दर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे अ.क्र.१ ते १० चे स्वतंत्र गट करुन निविदा मधील अटी शर्तीनुसार दोन लिफाफे पद्धतीने वर्तमानपत्रात तसेच मनपा नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिद्ध करुन मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक मातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन वार्षिक निविदा दर मागविणेस व निविदा जाहिरात प्रसिद्धीकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेबाबत सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे निर्णयास्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य व माल जरूरी प्रमाणे खरेदी मागविणेस मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- हे टेंडर कसे काढले जाते.

मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे :- यापुर्वी मॅन्युअल टेंडर होते आता ई- टेंडर आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- हा विषय मंजूर करा

मा.श्री.कुमार वाकळे :- विषय मंजूर करावा.

मा.श्री. संपत बारस्कर :- विषय मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेस सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता दैनंदिन कामासाठी लागणारे साहित्य व माल जरूरी प्रमाणे खरेदीकामी ई- निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करून वार्षिक निविदा मागविणेस मंजुरी मिळणेबाबत झालेल्या चर्चेनुसार सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वनुमते मंजूर.

सही /-<br>
सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १० सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १० सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा आस्थापना विभाग जा.क्र./वर्क.१ दि.५/५/२०१४

संदर्भ :- मा.मॅकेनिकल इंजि. पाणीपुरवठा प्रमुख यांचेकडील जा.क्र.पाणीपुरवठा विभाग १७७७

दि.२८/३/२०१४ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती की, मा. मॅकेनिकल इंजि. पाणीपुरवठा प्रमुख यांचेकडील जा.क्र.पाणीपुरवठा विभाग १७७७ दि.२८/३/२०१४अन्वयेचा प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "अहमदनगर महानगरपालिकेकडे असलेला अपुरा तांत्रिक वर्ग व त्यामुळे दैनंदिनसह महत्वाच्या कामात अडचणी निर्माण होत असल्याने खालील सर्व अभियंत्याची कंत्राटी पध्दतीने सहा महिन्यासाठी आस्थापना विभागामार्फत नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कंत्राटी अभियंत्याचे नावं / हुद्दा | नेमणूक दिनांक पासून / पर्यंत |
|---|---|---|
| १ | श्री. राहुल सदाशिव गिते | दि.१७/१०/२०१३ ते १५/०४/२०१४ |
| २ | कु.अमृता म्हातारदेव खाडे | दि.१७/१०/२०१३ ते १५/०४/२०१४ |
| ३ | श्री.स्वप्निल विठ्ठलराव जोशी | दि.१७/१०/२०१३ ते १५/०४/२०१४ |
| ४ | श्री. प्रदिप सदाशिव ढगे | दि.१७/१०/२०१३ ते १५/०४/२०१४ |
| ५ | श्री.बल्लाळ किरण सुरेश | दि.१८/११/२०१३ ते १७/०५/२०१४ |

पाणी पुरवठा विभागामार्फत मा.केंद्र शासनाच्या व मा. राज्य शासनाच्या विविध योजने अंतर्गत वेगवेगळया योजना राबविण्यात येत आहे. केडगाव प्रभाग पाणीपुरवठा योजना, अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना टप्पा- २, अहमदनगर शहर भुयारी गटार योजना दलित वस्ती पाणी पुरवठा योजना, वितरण व्यवस्था इत्यादी महत्वपुर्ण योजनांची विविध प्रकारची कामे प्रगतीपथावर असुन या अनुंषगाने या विभागास अभियंत्याची आवश्यकता आहे. तद्नंतर कंत्राटी अभियंत्याच्या विनंती अर्जावर सहानुभुतीपुर्वक विचार व्हावा." असे नमूद करून सुचित केलेले आहे.

सदयस्थितीमध्ये मा.मॅके.इंजि. , पा.पु. विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग ६४८ दिनांक २८/८/२०१३ व जा.क्र. पाणीपुरवठा विभाग ६६३ दिनांक ३०/८/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) यापदी अनु.क्र.१ ते४ यांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दि. १७/१०/२०१३ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर

जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०५ दि.४/१०/२०१३अन्वये व अनु.क्र.५ यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) यापदी अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून दिनांक १८/११/२०१३ पासून सहा महिन्या करीता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०६ दि.०४/१०/२०१३ अन्वये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर संबंधीताची वरील केलेल्या कंत्राटी करारबध्द कालावधीतील मानधनावरील नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था./वर्क.१४० दि.१७/१०/२०१३ अन्वये मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.१४७ दि.२३/१०/२०१३ अन्वये ठराव पारित करून पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व (मॅकेनिकल) यापदी कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता केलेल्या मानधनावरील कालावधीतील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०५ दिनांक ४/१०/२०१३अन्वये श्री. राहुल सदाशिव गिते व इतर यांची व जा.क्र.आस्था./कंत्राटी करारबध्द नेमणूक ४५०६ दिनांक ४/१०/२०१३ अन्वये श्री. बल्लाळ किरण सुरेश यांची सदरची वरील केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याच्या मानधनावरील करारबध्द नियुक्ती कालावधीतील पुर्ननियुक्ती मुदत ही अनुक्रमे दिनांक १६/४/२०१४ व दिनांक १७/५/२०१४ रोजी समाप्त होणार आहे.

यापुर्वी मा.मॅके.इंजिनियर, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र.पाणीपुरवठा विभाग १५५८ दिनांक २१/३/२०१३ व जा.क्र.पाणीपुरवठा विभाग १५६१ दि.२२/३/२०१३ अन्वयेच्या अहवालाच्या अनुषंगाने पाणीपुरवड्ठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व (मॅकेनिकल) तसेच इतर यापदी संबंधीतांची अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरिता दरमहा रू.२०,०००/- या मानधनावर करारबध्द नियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा जा.क्र.आस्था./वर्क. २४ दिनांक २९/४/२०१३ अन्वये मा.स्थायी समितीकडे निर्णयाकरीता पाठविण्यात आलेला होत.

सदरच्या अहवालाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दिनांक ४/५/२०१३ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

**"तसेच पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी पाणीपुरवठा विभाग प्रमुख (मॅके.इंजि.) यांचे मागणीनुसार महानगरपालिकेकडे अपुरा तांत्रिक कर्मचारी वर्ग व नागरिकांच्या सुविधेच्या दृष्टीकोनातून तसेच विविध योजनोतील कामे मार्गी लागणेकामी प्रशासनास येणा-या कामकाजातील अडचणी विचारात घेता ऑफिस रिपोर्टामध्ये नमूद कनिष्ठ अभियंता (सिव्हील, मॅकेनिकल ) यांना त्यांचे काम समाधानकारक असल्यास त्याची पुर्ननेमणूक तांत्रिक खंड देवून त्यांना नेमणूक देण्यात यावी व प्रस्ताव अंतिम मंजुरीकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावेत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी."**

मा.मॅकेनिकल इंजिनियर, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दि.४/५/२०१३ च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुंषगाने खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व (मॅकेनिकल) यापदी अ.नं. १ ते ४ यांची जा.क्र.आस्था. / कंत्राटी करारबध्द नेमणूक ७७९ दिनांक २५/४/२०१४ अन्वये दिनांक २५/४/२०१४ पासून सहा महिन्याकरिता व अनु.क्र.५ यांची तांत्रिक खंड देवुन जा.क्र.आस्था./ कंत्राटी करारबध्द नेमणूक ७८० दिनांक २५/४/२०१४ अन्वये दिनांक २०/५/२०१४ पासून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २०,०००/-(अक्षरी रू. वीस हजार मात्र) या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे पाणी पुरवठा विभागामध्ये करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ.नं. | नांव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रू. | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | २०,०००/- | पा.पु.विभाग |
| २ | कु.अमृता म्हातारदेव खाडे | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | पा.पु.विभाग |
| ३ | श्री.स्वप्निल विठ्ठलराव जोशी | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | पा.पु.विभाग |
| ४ | श्री. प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | २०,०००/- | पा.पु.विभाग |
| ५ | श्री.बल्लाळ किरण सुरेश | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) | २०,०००/- | पा.पु.विभाग |

वरील दर्शविलेल्या तक्त्या मधील कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व (मॅकेनिकल) ही पदे कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात सद्यस्थितीमध्ये सहा महिन्याकरिता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्ती कामी दरमहा अंदाजे रू.१,००,०००/- व सहा महिन्याचा एकूण खर्च रू.६,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत होईल त्यामुळे सदर होणा-या जादा खर्चामुळे आस्थापनाच्या दरमहा व वार्षिक खर्चामध्येही वाढ होणार आहे.

तरी वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व (मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवून सहा महिन्याकरीता दरमहा रूपये २०,०००/-(अक्षरी रूपये वीस हजार मात्र)या मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता मा.स्थायी समिती ठराव क्र.२८ दिनांक ४/५/२०१३ च्या पारित झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांचे मान्यतेने मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) या पदांवर सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.उमेश कवडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिप चव्हाण :- पाणीपुरवठा विभागाच्या आत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात नेमण्यात येणा-या कर्मचा-यांच्या प्रस्तावाच्या प्रमाणेच अन्य आवश्यक कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या प्रस्तावासोबत हा विषय सादर करावा.

मा.श्री.शेख फय्याज अजिजोददीन :- पाणीपुरवठा विभागाच्या आवश्यक तत्पुरत्या कर्मचा-यांच्या नियुक्तीच्या प्रस्तावाबरोबर एकत्र सादर करा.

मा.श्री. उमेश कवडे :- हा प्रस्ताव रदद करा व पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचारी नियुक्ती, पुर्ननियुक्तीचे ठराव एकाच वेळी सादर करा.

मा.सभापती साहेब :- वॉलमनचे , फिटर यांचे नेमणुकीच्या कार्यवाहीच्या प्रस्तावासह कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा.

**ठराव :-** पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता(सिव्हील) व ( मॅकेनिकल) या पदांवर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नुसार सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट वर सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

या प्रस्तावासोबत आवश्यकते नुसार फिटर व वॉलमन यांची नियुक्ती करणे बाबत प्रस्ताव दयावा.वॉलमनचे,फिटर यांचे नेमणुकीच्याकार्यवाहीच्या प्रस्तावासह कनिष्ठ अभियंता (सिव्हील)व(मॅकेनिकल) यांना मानधनावर पुर्ननियुक्ती बाबत फेरप्रस्ताव सादर करावा,
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :-मा.श्री.शेख फय्याज अजिजोददीन सही/-

अनुमोदक :- मा.श्री.उमेश कवडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- ११ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- ११ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीसाठी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयाची सन २००९-१० पर्यतची थकबाकी तसेच ठेउन सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा प्रभाग समिती क्र.२ वसुली दि.३१/१२/२०१३

उपरोक्त विषयान्वये दिल्लीगेट येथील महानगरपालिकेच्या मालकीचे एकुण ६६ गाळे मार्केट विभाग जा.क्र.४९ दि.२२/४/२०१०रोजी नोटीस देउन रस्ता रूंदीसाठी दि.२५/४/२०१०रोजी संपुर्ण पाडण्यात आलेली आहे.सर्व(६६गाळे) मालमत्तावर सन २०१२-१३ पर्यतची थकबाकी रू.१२८७५१७/- इतकी आहे.सन२००९-१० पर्यतची थकबाकी रू७४२४८५/- इतकी होती व सन २०१०-११ ते २०१२-१३ अखेर थकबाकी रू.५४५०३२/- इतकी आहे.

तरी सन २००९-१० पर्यतची थकबाकी रू.७४२४८५/- तशीच ठेउन उर्वरीत सन २०१०-११ ते २०१२-१३ पर्यतची थकबाकी रू.५४५०३२/- निर्लेखित करण्यास मंजुरी मिळावी सोबत संपुर्ण गाळेधारकांची यादी पान क्र. १ ते ३ जोडत आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५२ नुसार मा.आयुक्त, स्थायी समिती यांच्या मान्यतेने रू.५४५०३२/-इतकी रक्कम निर्लेखित करण्यास तसेच सदर नोंदी घेण्यास मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे कर निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर प्रभागअधिकारी यांचा अभिप्राय की, रिव्हीजन विभाग तपासून सादर करा.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, सादर दिल्लीगेट शॉपींग सेंटर रस्ता रूंदीकरणमध्ये दिनांक २५/४/२०१० रोजी जमीनदोस्त केलेले आहेत सदयस्थितीत गाळे अस्तीत्वात नसल्याने दिनांक १/४/२०१० पासून ६६ गाळयावर करण्यात येत असलेली मालमत्ता कराची आकारणी रद्द करणे आवश्यक आहे.सदरची आकारणी अदयापी रद्द केलेली नसल्याने सदयस्थिती सदर गाळयावरील कर आकारणी चालु आहे त्यामुळे सन २०१२-१३ यावर्षा अखेर होणारी कर आकारणी व शास्तीची रक्कम रूपये ५,४५,०३२/- इतकी रक्कम वसुल न होणारी असल्याने उक्त अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणेस हरकत नाही मात्र सन २००९-१० या वर्षापर्यत गाळयाचा वापर केलेला असल्यामुळे रू.७,४२,४८५/- इतके रक्कम संबंधीत भाडेक-यांकडून वसुल करावी. संबंधीत गाळेधारकांच्या महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या मिळकतीवर त्याच्याकडे असलेल्या कराची थकबाकीची रक्कम दर्शवुन वसुल करावी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.२ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक , स.मू.नि.क.सं.अधिकारी यांनी दिलेल्या सविस्तर अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा निर्णयास्तव ठेवणे उचित सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,चर्चा करावी.समक्ष चर्चा केली .त्यानुसार संबंधी गाळे मनपाने पाडण्यानंतर थकबाकीची रक्कम निर्लेखित करणे मा.स्थायी समिती आदेशार्थ सादर करणेस मान्यता देणेत येते.मात्र नमूद गाळे पाडण्या अगोदरची थकबाकीची रक्कम वसुल करणेत यावी.

**दिल्लीगेट येथील गाळे मार्केट विभाग जा.क्र.४९ दि.२२/४/२०१० रोजी नोटीस देउन दि.२५/४/२०१० रोजी पाडण्यात आलेले गाळेधारकांची यादी वॉर्ड क्र.२६**

| अ. क्र. | बिल क्र. | नांव | सन २००९-१० पर्यत | सन २०१०-११ ते २०१२-१३ अखेर | एकुण थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ९६० | बाळकृष्ण धोंडीराम जाधव | ८८०४ | ७४९२ | १६२९६ |
| २ | ९६१ | श्रीकांत बजरंग अष्टेकर | ११९४३ | ७५७१ | १९५१४ |
| ३ | ९६२ | राजेशलाल चंद उधाणी | १२०२४ | १००२१ | २२०४५ |
| ४ | ९६३ | सुभाष उध्दवराव मानकर | - | ३४८७ | ३४८७ |
| ५ | ९६४ | रामसिंग दत्तात्रय शहापुरे | १३४०१ | ९६२७ | २३०२८ |
| ६ | ९६५ | नंदकिशोर बारकु रोकडे | १५००९ | ९९१४ | २४९२६ |
| ७ | ९६६ | कृष्णा राजाराम कोडम | १५०३१ | ९९२१ | २४९५२ |
| ८ | ९६७ | शे. हुसेन बाबुलाल | १५१४१ | ७२९० | २२४३१ |
| ९ | ९६८ | दिलीप रामभाउ बिमकर | ७७०३ | ६८०८ | १४५११ |
| १० | ९६९ | धोंडीराम देविदास हराळे | ६१८० | ६५३४ | १२७१४ |
| ११ | ९७० | सुनिल दुल्लम | ५१५५ | ५४९३ | १०६४८ |
| १२ | ९७१ | नारायण हिरामल सामल | १६२०६ | १०७५४ | २६९६० |
| १३ | ९७२ | दिनेश लालसिंग परदेशी | १३१४८ | ९५८२ | २२७३० |
| १४ | ९७३ | दिपक लालसिंग परदेशी | १३९३३ | ९७२३ | २३६५६ |
| १५ | ९७४ | प्रतिज्ञा अशोक हरिपावन | १५९०० | १०६९७ | २६५९८ |
| १६ | ९७५ | शांतीलाल सोनम्रा | २०१३३ | ११४६० | ३१५९३ |
| १७ | ९७६ | राजेंद्र रामभाउ राहिंज | १४३०३ | ९७९० | २४०९३ |
| १८ | ९७७ | विजय अशोक कन्हेरकर | १५१३५ | ११०७३ | २६२०८ |
| १९ | ९७८ | अरूण शिवाजी ढापसे | ७६८९ | ६८०५ | १४४९४ |
| २० | ९७९ | बाबासाहेब धोंडीबा भाबंरकर | १७३२६ | ८५४० | २५८६६ |
| २१ | ९८० | नारायण पंढरीनाथ सदरे | १३४९४ | ९६४४ | २३१३८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | ९८१ | मधुकर नारायण येनगदुल | ६८६३ | ६६५७ | १३५२० |
| २३ | ९८२ | नगरे तुळशीराम रामभाउ | - | ४०३९ | ४०३९ |
| २४ | ९८३ | रामचंद्र बाबुराव वरूडे | ६७९० | ६६४४ | १३४३४ |
| २५ | ९८४ | सौ. रश्मी कुलदीप मटीग्यानी | १४१९६ | ९७७० | २३९६६ |
| २६ | ९८५ | सिमाबाई नानकराम उदासी | ८२६२ | ७३९५ | १५६५७ |
| २७ | ९८६ | रामेश्वर अंबालाल चव्हाण | ७५०८ | ७१५७ | १४६६५ |
| २८ | ९८७ | दिपक नानकराम ललवाणी | ७११८ | ६७०३ | १३८२१ |
| २९ | ९८८ | शंकर ज्ञानोबा बिडवे | १३३७० | १०६२२ | २३९९२ |
| ३० | ९८९ | दिपक शंकर बिडवे | ६७४० | ६६३५ | १३३७५ |
| ३१ | ९९० | चांदमल सोनल सिसोदिया | १६५७६ | ११५७४ | २८१५० |
| ३२ | ९९२ | बाबुचंद जेठाचंद उदासी | ६९०४ | ६६६४ | १३५६८ |
| ३३ | ९९१ | चांदमल सोनल सिसोदिया | १७१८८ | ११६८५ | २८८७३ |
| ३४ | ९९३ | मालनबाई खांडेकर | ७३६० | ६७४६ | १४१०६ |
| ३५ | ९९४ | बाबासाहेब यशवंत वाघमारे | ७२९० | ८५२७ | १५८१७ |
| ३६ | ९९५ | लक्ष्मी गणपत चिलका | २८८७२ | १२४१२ | ४१२८४ |
| ३७ | ९९६ | नारायण गणपत चिलका | - | ३४८७ | ३४८७ |
| ३८ | ९९७ | विठ्ठल पेंटय्या उदबुर | ७६३७ | ६७९६ | १४४३३ |
| ३९ | ९९८ | दत्तात्रय लक्ष्मण चिलका | १४७०८ | ९८६३ | २४५७१ |
| ४० | ९९९ | दिलीप तोताराम लसगरे | ७६३७ | ६७९६ | १४४३३ |
| ४१ | १००० | चंद्रकांत नरसय्या सब्बन | ५५३२ | ६४१७ | ११९४९ |
| ४२ | १००१ | सुरेश चंदनमल सिसोदिया | १३०६३ | ९४२८ | २२४९१ |
| ४३ | १००२ | प्रमिला छोटू धुमाळ | २१३५८ | ९०५७ | ३०४१५ |
| ४४ | १००३ | अरूण दत्तात्रय सोनवणे | १२५६७ | ८५०८ | २१०७५ |
| ४५ | १००४ | गोविंद अर्जुन खोडके | - | ३४८७ | ३४८७ |
| ४६ | १००५ | प्रभाकर भाउ धोत्रे | १५९६४ | १०१०२ | २६०६६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४७ | १००६ | लता दिलीप दहीवाले | १८०४९ | ९८७९ | २७९२८ |
| ४८ | १००७ | सुरेद्रं माधवराव शेकटकर | २२०३४ | ११०५६ | ३३०९० |
| ४९ | १००८ | सुहास कुष्णराव पाठक | ११५५० | ७५०० | १९०५० |
| ५० | १००९ | बी.एम. कांबळे | १२३३६ | ५६३६ | १७९७२ |
| ५१ | १०१० | दासी विजय रामराव | ४२३९ | ६५६८ | १०८०७ |
| ५२ | १०११ | अर्जुन राजाराम दासी | ७३१३ | ८५४५ | १५८५८ |
| ५३ | १०१२ | विश्वनाथ जगन्नाथ यादव | ६७३७ | ६६३४ | १३३७१ |
| ५४ | १०१३ | रूख्यिणीबाई जगन्नाथ यादव | ९६०६ | ८९४४ | १८५५० |
| ५५ | १०१४ | संजय विठ्ठल बल्लाळ | ११९४० | ८५५३ | २०४९३ |
| ५६ | १०१५ | नारायण विठ्ठल बल्लाळ | १५०२९ | ९९२० | २४९४९ |
| ५७ | १०१६ | अशोक माधवराव गाडे | १७९९१ | ९८६९ | २७८६० |
| ५८ | १०१७ | अशोक रंगनाथ जाधव | १२४२७ | ८८६७ | २१२९४ |
| ५९ | १०१८ | दत्तात्रय दगडू शेकटकर | ७५२२ | ६७७५ | १४२९७ |
| ६० | १०१९ | संतोष खंडेलवाल | १२०९९ | ८९१० | २१००९ |
| ६१ | १०२० | प्रकाश रंगनाथ कुलकर्णी | ७६३७ | ६७९६ | १४४३३ |
| ६२ | १०२१ | राहुल सुधाकर साळवे | ५२७३ | ६३७१ | ११६४४ |
| ६३ | १०२२ | रमेश लक्ष्मण कोडम | १४१५० | ९७६२ | २३९१२ |
| ६४ | १०२३ | मोहन माणिक गायकवाड | ११८२२ | ७५४९ | १९३७१ |
| ६५ | १०२४ | साहेबराव वडागळे | ७६३७ | ६७९६ | १४४३३ |
| ६६ | १०२५ | दशरथ गंगाराम चाबुकस्वार | १५९३३ | १०७०४ | २६६३७ |
| | | | ७४२४८५ | ५४५०३२ | १२८७५१७ |

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीसाठी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयाची सन २००९-१० पर्यतची थकबाकी तसेच ठेउन सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दत्तात्रय कावरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- याची प्रोसेस काय

मा.श्री. दिप चव्हाण :- हे ६६ कोण आहेत त्याची यादी काय, त्यांनी ट्रान्स्फर केले होता त्यांचे पुर्नवसन झाले का

मा.सभापती साहेब :- माजी आयुक्त श्री .काकडे साहेब यांनी सांगीतले होते.

मा.श्री. दिप चव्हाण :- हा विषय स्थगित ठेवा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- त्यांच्या पुर्नवसनाचा प्रस्ताव आणा. त्यावेळी हा प्रस्ताव ठेवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्यांचा पुर्नवसनाकरीता जागा दिली होती. बेग पटांगण येथे त्यांचे पुर्नवसनकारण्याचे ठरले त्या नुसार त्यांची यादी केली आहे.त्यावेळची थकबाकी यासह नंतर पुर्नसवानांच्या वेळी हा प्रस्ताव ठेवा.

मा.सभापती साहेब :- त्यांचे पुर्नवसन करा.

मा.श्री. दिप चव्हाण :- ज्यादिवशी गाळे पाडले त्यादिवशीपासून वसुली, शास्ती थांबवा.

मा.सभापती साहेब :- वसुली शास्ती थांबवा.

मा.श्री.उमेश कवडे :- दिल्लीगेट येथील गाळेधारकांचे पुर्नवसन करून नंतरच हाविषय सभेपुढे आणावा. तो पर्यन्त हा विषय पुन्हा संबंधीत विभागाकडे पाठविण्यात यावा.

मा.श्री. सचिन जाधव :- आधी गाळेधारकांचे पुनर्वसन करा.नंतर हा विषय सभेपुढे आणा.

मा.सभापती साहेब :- दिल्लीगेट येथील गाळेधारकांचे पुर्नवसन करावे नंतर हा प्रस्ताव स्थायी समिती कडे पाठवावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे दिल्लीगेट येथील रस्ता रूंदीसाठी पाडण्यात आलेले एकुण ६६ गाळयाची सन २००९-१० पर्यतची थकबाकी तशीच ठेउन सन २०१०-२०११ ते २०१२-२०१३ अखेर थकबाकी रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्टवर ठराव करण्यातयेतो की, दिल्लीगेट येथील गाळेधारकांचे अद्याप पर्यन्त पुनर्वसन झालेले नाही.गाळेधारकांचे पुर्नवसन करण्यात यावे त्यानंतर विभागाने हा प्रस्ताव फेरसादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. उमेश कवडे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. सचिन जाधव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १२ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १२ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा सार्वजनिक बांधकाम विभाग दिनांक

कामांचे नांव : फेर निविदा क्र.७ सन २०१३-१४ ई- निविदा क्र.५३२ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पाईप लाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे या कामाच्या निविदा मंजुरी बाबत.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. शासन निर्णय क्र. नगरो-२०१०/प्र.क्र.२४२/नवी-३३ मंत्रालय मुंबई ३२ यांचे दिनांक ३१/३/२०११ अन्वये मंजुरी

२] प्रशासकीय मान्यता रक्कम रू. : १८०.१७ लाख (पुल + विदुयत काम )

३] तांत्रिक मान्यता रक्कम रू. : ७६,६९,१४८/-

४] तांत्रिक मान्यतेची दरसुची : सा.बां.वि. म.जि.प्रा.सन २०१०-११

५] निविदा (परिशिष्ट ब) रक्कम रू. : ७६,६९,१४८/-

६] निविदा प्रसिध्दी तारीख : ई- निविदा क्र.५३२ ते ५३३ दि.१५/०३/२०१३

७] निविदा विक्री कालावधी : दि.१५/३/२०१३ ते २१/३/२०१३

८] निविदा स्विकारण्याची तारीख : दि.२५/३/२०१३ ते २८/३/२०१३ अखेर

९] निविदा उघडण्याची तारीख : दि. १७/४/२०१३

१०] कामाची मुदत : ६ महिने

११] प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील :

| अ.नं. | ठेकेदारांचे नाव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर | २७.२७% जादा |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांचा देकार निविदा दरापेक्षा २७.२७ टक्के जादा आलेला आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक सन २०११-२०१२ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले होते. चालू दरसुची सां.बां.वि. २०१२-१३ नुसार निविदा धारकाने भरलेला दर ८.७९% जादा येत आहे.

संबंधित निविदाधारकास निविदा दराच्या वाटाघाटीबाबत मा.छाननी समितीसमोर दि.१८/०६/२०१३ रोजी बोलाविले असता संबंधित निविदाधारकाने आहे. सदरचे काम निविदा दरापेक्षा २६.९३ % जादा दराने करणेस तयार असलेबाबत पत्र दिलेले आहे. चालू दरसुची सां.बा. वि. २०१३-१४ नुसार निविदा धारकाने कमी करून दिलेला सुधारित दर ८.५०% जादा येत आहे. त्यानुसार छाननी समितीने सदर काम निविदा दरापेक्षा २६.९३% दराने देणेबाबत शिफारस केली आहे.

निविदेबाबतच्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १२ | सुधारित देकारानुसार येणारी किंमत | रू.९०,३७,८२३/- |
| १३ | चालु दरसुची सां.बा.वि. २०११-१२ अनुसार कामाची किंमत | रू.८३,२९,९६१/- |
| १४ | ठेकेदाराची सुधारित किंमत व कामाची अद्यावत किंमत या मधील फरक | रू.७,०७,८६२/- |
| १५ | चालु दरसुची नुसार अधिक्याची टक्केवारी (सन ११-१२) (१४x१००) / १२ | ८.५०% जादा |

तरी मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीनुसार सदरची निविदा ठेकेदार मे.ए.सी.कोठारी यांना निविदा दरापेक्षा २६.९३% जादा दराने देणेस सदरची निविदा मंजुरीस्तव तथा मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव पाठविणेस सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, **अ** प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, **अ** प्रमाणे मा.छाननी समितीने मे.ए.सी. कोठारी यांचे शिफारस केलेले निविदा दर मान्यतेकरिता निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **अ** नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त यांची दर्शक सहमती सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- निविदा कधी शहर अभियंता सन २०१२-१३ मध्ये सन २०१३-१४ मध्ये काहीच प्रोसेस झाली नाही का

मा.श्री. दिप चव्हाण :- १ वर्षानंतर कार्यवाही करायची तर कायदा काम सांगतो.

शहर अभियंता श्री. मगर :- हा टेंडर मंजूर.

मा.सभापती साहेब :- सन २०११-१२ च्या ला मान्यता देता येईल का ?

शहर अभियंता श्री. मगर :- स्थायी समिती देउ शकते.

मा.श्री. दिप चव्हाण :- मुख्यलेखापरिक्षक सांगा.

मुख्य लेखा परिक्षक श्री.अनारसे :- निविदा प्रक्रिया सन २०१३-१४ मध्येच केली आहे.

मा.सभापती साहेब :- ठेकेदार असा अर्ज देईल की मला परवडत नाही.कारण दर जुना आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- रिकॉल करा.

मा.सभापती साहेब :- रिकॉल करा. नवीन माणूस चांगले काम करील.फ्रेश टेंडर करा.

शहर अभियंता श्री. मगर :- ऐस्टीमेंट तेच पण DSR चालू दराने घेउ.

मा.सभापती साहेब :- याचा पाठपुरावा केला नाही. नुकसान होते. यात आर्थिक भुखंड बसत असेल तर उपयुक्त यांनी विचार करून निर्णय घ्या. त्यानंतर प्रस्ताव तपशीलासह सादर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- या प्रस्तावावर परत विचारविनीमय करून फेरसादर करावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- मागील वर्ष व या वर्षीच्या दरांचा विचार करून आर्थिक दृष्टीने योग्य तो प्रस्ताव फेरसादर करा.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावीत केल्याचा दिनांक तत्कालीन दर व सदयस्थितील दर या बाबत विभागाने आदयावत रिपोर्टसह स्थायी समितीकडे हा प्रस्ताव फेरसादर करावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हददीतील पाईपलाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणेकामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्ट यावर ठराव करण्यात येतो कि,काम प्रस्तावीत केल्याचा दिनांक तत्कालीन दर व सदयस्थितील दर या बाबत विभागाने आदयावत रिपोर्टसह स्थायी समितीकडे हा प्रस्ताव फेरसादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत करावी.

सुचक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १३ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १३ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा प्रकल्प विभाग दिनांक दिनांक

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव ३४ पैकी येथे मनपाच्या मालकीच्या २० एकर जागेवर सन २००१ पासून शहरात निर्माण होणा-या घन कच-याची साठवणूक करण्यात येते. सदर ठिकाणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर घनकच-यापासुन खत निर्मिती करणे बाबत हायड्रोएअर टेक्टॉनिक्स (पीसीडी) लि. बेलापुर, नवि मुंबई या एजन्सीस दि.१५/१०/२००८ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला होता.सदर एजन्सी मार्फत कंपोस्ट प्रोसेसिंग प्लॅन्टचे काम प्लिंथ लेव्हल पर्यंत करण्यात आले. या व्यतीरीक्त काही प्रमाणात आर.सी.सी बांधकाम करण्यात आले आहे.तदनंतर सदर कंपनीने काम बंद केले याबाबत सदर कंपनीस मनपामार्फत अनेक वेळेस नोटीस देण्यात आल्या परंतु कंपनीने प्रकल्प उभारणीचे काम केले नाही.

दि.०३/०२/२०११ रोजी हायड्रोएअर टेक्टॉनिक्स (पीसीडी) लि. बेलापुर, नवि मुंबई या कंपनी सोबत मनपाने केलेला करारनामा रद्द करण्यात आला.तदनंतर मनपाने BOT तत्वावर खत निर्मिती प्रकल्प उभारणेकरीता ६ वेळेस (ई-निविदा क्र.४०४,४२६,५१३,५२४,५३७,६२४) मागविण्यात आल्या परंतु सदर निविदेस कुठल्याही एजन्सीने प्रतीसाद दिला नाही. बुरुडगाव स.नं. ३४ या जागेवरील असलेला कचरा डेपो बाबत बुरुडगाव येथील ग्रामस्थ श्री भाऊसाहेब भिमाजी कुलट यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे याचिका दाखल केली आहे. सदर याचिका पुणे येथील **NATIONAL GREEN TRIBUNAL, PUNE** येथे **APPLICATION NO. 9 (THC)/2013(WZ)** येथे वर्ग करण्यात आली आहे. अहमदनगर महानगरपालिकेस BOT तत्वावर मागविण्यात आलेल्या निविदेस कुठलीही एजन्सी प्रतिसाद देत नसल्यामुळे दि.२१/०१/२०१४ रोजी ई- निविदा क्र.७०२ नव्याने प्रसिध्द करण्यात आली यामध्ये Operation and Mentainence करीता Tipping charges मनपा देणार असल्याचे नमुद करण्यात आले. परंतु सदर निविदेस देखील कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही.

सदर बाबत मनपा मार्फत मागविण्यात येणा-या निविदेस प्रतिसाद मिळत नसलेबाबत मे.कोर्टाच्या निदर्शनास आणले. याबाबत दि.१८/०३/२०१४ रोजी मे. कोर्टाने खालील प्रमाणे आदेश निर्गमीत केले.

**<u>कोर्टाचे आदेश</u>**

मनपाने ३ महिन्याच्या कालावधीमध्ये खत निर्मिती प्रकल्प उभारणीचे काम पुर्ण करुन प्रत्यक्ष कच-यावर प्रक्रिया सुरु करावी याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे मार्गदर्शन घेणे व अंदाजपत्रकीय तरतुदीसह महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे समवेत Joint Action plan सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार दि.१३/०३/२०१४ रोजी अहमदनगर महानगरपालिका व प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक यांनी संयुक्तरीत्या Joint Action plan मे. कोर्टाकडेस सादर केला आहे.

अहमदनगर मनपास BOT एजन्सी उपलब्ध होत नसल्याने व मे. कोर्टाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मनपा बरुडगाव येथील जागेवर कच-यावर प्रक्रिया व विल्हेवाट लावणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे करीता Online Expression of interest मागविण्यात आले.

सदर कामासाठी मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे या कंपनीचा एकच प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर कंपनीने बार्शी नगरपरिषद,बार्शी येथे अशा प्रकारचा प्रकल्प ३०मे.टन प्रतीदिन क्षमतेचा विकसीत केला आहे. सदर प्रकल्पाची मनपाचे शहर अभियंता यांनी प्रकल्प अभियंता यांचे समवेत पहाणी केली आहे.

मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांनी Expression of interest यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करुन सदरचा अहवाल छाननी समितीकडे सादर केला व याबाबत छाननी समितीने दि.२१/०/५/२०१४ खालील प्रमाणे अहवाल दिला आहे.

**छाननी समिती अहवाल**

मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांचेकडेस प्रकल्प उभारणीचा अनुभव नाही व स्थापत्य कामाचे PWD कडेस रजिस्ट्रेशन नाही. याबाबत सदर एजन्सीने प्रकल्पातील स्थापत्य कामे मनपामार्फत करुन मिळावेत असे दि.२०/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार स्थापत्य कामाचे शहर अभियंता यांनी दिलेल्या तांत्रिक मंजुरीनुसार स्वतंत्र निविदा मागविणे उचित वाटते.

मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांनी खत निर्मिती प्रकल्प करीता आवश्यक असलेल्या यंत्र सामुग्रीचे दिलेले दर पत्रकास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून दि.२९/०३/२०१४ अन्वये तांत्रिक मान्यता घेण्यात आलेली आहे व त्यानुसार सदरचे काम मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांचेमार्फत करुन घेणेस शिफारस आहे.

मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांनी Operation and Mentainence बाबत Expression of interest मध्ये नमुद केलेले दर रु.३३६/- वरुन चर्चे अंती, वाटाघाटी नंतर कमी करुन रु. ३११/- प्रती मेट्रीकटन असे दर नमुद केले आहेत व प्रती वर्ष Operation and Mentainence करीता नमूद प्रती मेट्रीकटन रु.३११/- या दरात १०% दर वाढ मागितली आहे. त्यानुसार कमाल १२५ मेट्रीकटन प्रतीदिन कच-यावर प्रक्रिया झाल्याचे गृहीत धरल्यास Operation and Mentainence करीता संबंधित ठेकेदारास रु.३८,८७५/- प्रती दिनद्यावे लागतील व प्रती वर्ष रु. १,४१,८९,९३५/- इतका खर्च अपेक्षित आहे. या व्यतीरीक्त प्रती वर्ष Operation and Mentainence करीता नमूद दरात त्यांनी १०% दर वाढ मागितली आहे.तसेच मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे यांनी मनपास प्रतीदिन निर्माण होणा-या खतापासुन रु. १ लाख प्रती महिना रक्कम देणार आहे असे नमुद केले आहे. संबंधित ठेकेदाराने वाटाघाटीमध्ये यापेक्षा कमी दराने काम करणेस नकार दिला आहे. सदरचे दर अवाजवी आहेत.कच-यावर प्रक्रिया करणेस खर्च रु.२००/- ते २२५/- पर्यंत प्रती मेट्रीकटन देणे उचित होईल.

प्रकल्पाच्या ठिकाणी प्राप्त होणा-या कच-यावर सेंद्रिय खत निर्मिती करणे व इतर घटकाची सॅनेटरी लॅण्ड फिल साईटमध्ये शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे अपेक्षित आहे. तसेच प्रकल्प चालविणेसाठी येणारा संपुर्ण खर्च म्हणजे लाईट बिल,पाणी बिल, मजुरी खर्च, वॉचमन, Operation and Mentainence अंतर्गत कच-याची वाहतुक व अनुषंगीक कामे या रक्कमेत ठेकेदाराकडून होणे आवश्यक आहे. मे. **NATIONAL GREEN TRIBUNAL, PUNE** येथे **APPLICATION NO. 9 (THC)/2013(WZ)** अन्वये बुरुडगाव स. नं. ३४ बाबत केस चालू आहे.सदर बाबत मे. कोर्टाने ३ महिन्याच्या कालावधीमध्ये खत निर्मिती प्रकल्प उभारुन चालू करणे बाबत मनपास आदेशीत केले आहे. तसेच यासाठी मे. कोर्टाकडील पुढील तारीख दि.३०/०५/२०१४ रोजी आहे. तरी याबाबत मा. स्थायी समितीने उचित निर्णय घेणे बाबत छाननी समिती अहवाल सादर करीत आहे.

मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे या एजन्सीने कच-यावर प्रक्रिया करणेबाबत Expression of interest खालील प्रमाणे यंत्र सामुग्री पुरविणे व बसविणे बाबत नमुद केले आहे.

| Sr. No. | Specification | Total Amt |
|---|---|---|
| 1 | Providing and installing of weigh bridge (capacity 40 tons), separation machine covering, control panel, machines coated by non corrosive synthetic film (additional attachment as per project requirement). | Rs.68,62,000=00 |
| 2 | Providing and installing of vibro screening machine, organic shredding mill,machine covering, control panel, machines coated by non corrosive synthetic film (additional attachment as per project requirement ). | Rs.57,32,120=00 |
| | Total | 1,25,94,120=00 |

वरील यंत्र सामुग्रीस मा.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना विभाग,अहमदनगर यांचे कडून दि.२९/०३/२०१४ रोजी वरील अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार यंत्र सामुग्री बसविणे करीता रक्कम रु १,२५,९४,१२०/- इतका खर्च अपेक्षित आहे व Operation and Mentainence करीता रु.२००/- ते २२५/- प्रती मेट्रीकटन प्रतीदिन खर्च गृहित धरल्यास प्रती वर्ष अंदाजे रक्कम रु.९१,२५०००/- ते रु. १,०२,६५,६२५/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच संबंधित ठेकेदारामार्फत कच-यावर करण्यात येणा-या प्रक्रिया नंतर तयार होणा-या खतावर ठेकेदार मनपास रक्कम रु.१ लाख प्रतीमहा देणार आहे. खत विक्रीची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील. मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे या एजन्सीस खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधिन राहुन सदरचा कंत्राट देणे उचित वाटते.

## अटी व शर्ती

**1)** सदर प्रकल्प अंतर्गत यांत्रिकी मशिनरी पुरविणे, बसविणे व यशस्वी चाचणी देणेचा कालावधी 3 महिने इतका राहील.

2) ठेकेदाराने यांत्रिकी मशिनरीकरीता आवश्यक तो संकल्पने शासकीय तंत्र निकेतन किंवा इंजिनिअरींग कॉलेज कडुन आधी तयार करुन घेणे आवश्यक आहे.

3) ठेकेदाराने एकुण प्रकल्प रक्कमेच्या 10 % रक्कम मनपाकडेस सिक्युरीटी डिपॉझीट जमा करणे आवश्यक आहे.

4) एकुण प्रकल्प Operation and Mentainence चा कालावधी 3 वर्ष इतका राहिल.

5) ठेकेदाराचे काम असमाधानकारक असल्यास सदरचा ठेका रद्द करण्यात येवुन सिक्युरीटी डिपॉझीट रद्द करण्यात येइल.

6) कंत्राटदार हे महानगरपालिकेच्या मालकीच्या खालील वर्णन केलेल्या व सध्या कचरा डेपो म्हणुन वापरात असलेल्या मौजे बुरुडगांव स. नं. 34 (पैकी) ता.अहमदनगर येथील जागेपैकी 10 एकर जागेवर प्रकल्प राबवितील व त्या संबंधीत केंद्र सरकार व महाराष्ट्र प्रदुषण मंडळ व इतर सक्षम प्राधिकारी यांनी विहित केलेल्या अटी व शर्ती त्यांनी पाळावे लागेल.

7) सदर प्रकल्पा अंतर्गत कंत्राटदाराला खाली नमुद केलेल्या नियम व कायद्या अंतर्गत अंमलबजावणीचे काटेकोर पालन करुन सदरहु प्रकल्पाचे काम करावे लागेल व त्याचे अनुकरण करावे लागेल.

**अ.** Bombay Provincial Corporation Act, १९४९ व त्याखालील असलेले सर्व नियम व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा (ज्यांचा यापुढे सदरहु नियम म्हणुन उल्लेख केलेला आहे.)

**ब.** नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा (Amendment) (ज्याचा सदरहु नियम म्हणुन उल्लेख केलेला आहे.)

8) सदर प्रकल्पाकरीता कंत्राटदार यांना नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 चे अंतर्गत प्रकल्पाची उभारणी व प्रकल्प चालविण्यासाठी केंद्र सरकारचे व्दारा प्राधिकृत **(Authorisation)** महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन प्रमाणीत करुन घ्यावे लागेल. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे कडील आवश्यक व प्राधिकार (ऑथोरायझेशन), ना हरकत दाखला (परवाना), संमतीपत्र , परवानग्या घेण्याची तसेच मिळालेल्या प्रमाणपत्राचे (ऑथोरायझेशनचे) नुतनीकरण दर वर्षी करुन घेण्याची व आवश्यक नोंदवही ठेवुन अहवाल व कागदपत्र सादर करणेची जबाबदारी सदर खाजगी कंत्राटदाराची राहील. त्यासाठी आवश्यक ते सहकार्य महानगरपालिका करेल. त्याच प्रमाणे प्रकल्पासाठी नियमानुसार वेळोवेळी जे तंत्रज्ञान अद्यावत करावे लागेल. तसेच सदर नियमा अंतर्गत प्रकल्पास आवश्यक असलेला किमान दर्जा राखण्यासाठी सर्व जबाबदारी सदर खाजगी कंत्राटदाराची राहील.

9) सदर प्रकल्प हा करारनामा निष्पादीत (Execute) झाल्याचे तारखेपासुन ३ महिने या कालावधीमध्ये उभा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील तसेच करारनाम्याच्या तारखेपासुन ३ व्या महिन्या अखेर पर्यंत कंत्राटदाराला महानगरपालिकेकडुन घनकचरा स्विकारणे तसेच त्याचे प्रक्रिया करण्यास बंधनकारक आहे.

10) सदर प्रकल्पा करीता आवश्यक असणारा घनकचरा महानगरपालिका हद्दीतुन जमा करणे व त्याचे ठिकाणा पर्यंत वाहतुक करणे ही जबाबदारी महानगरपालिका, अहमदनगर यांचे राहील. यामध्ये खालील घनकच-याचा समावेश राहील.

अ. हॉटेल, रेस्टॉरंट व मंगलकार्यालय मधील कचरा.

ब) भाजीबाजार मधील कचरा

क) उद्यान मधील कचरा

कंत्राटदारास अहमदनगर महानगरपालिका क्षेत्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही क्षेत्रातुन घनकचरा आणता येणार नाही व त्यावर प्रक्रिया करता येणार नाही.

11) सदर प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेने पुरविलेला घनकचरा कंत्राटदाराला लागलीच स्विकारावा लागेल व त्याचे नियमाप्रमाणे योग्य तो विल्हेवाट लावावा लागेल. सदर कंत्राटदाराला घातक व जैव वैद्यकीय कचरा वगळुन सर्व नागरी घनकचरा स्विकारावा लागेल. तसेच प्रकल्प उभारणे बाबत संबंधीत कंपनीशी करारनामा केल्यानंतर व कामाचा आदेश दिल्यानंतर कंपनीच्या अडचणीमुळे किंवा इतर कुठल्याही कारणामुळे संबंधीत कंपनीने काम करण्यास नकार दिल्यास मनपाने देवु केलेला सर्व कचरा स्विकारु शकत नसल्यास तसेच विहित मुदतीत कचरा स्वीकारण्यास किंवा त्याचे विल्हेवाट लावण्यास अपयश आल्यास कंत्राटदाराला रु. 3,000/- प्रति रोज प्रमाणे पहिले 15 दिवस व त्यानंतर रु.5,000/- प्रति रोज प्रमाणे कचरा स्विकारे पर्यंत व त्याचे विल्हेवाट लावे पर्यंत दंड आकारण्यात येईल व तो दंड कर म्हणुन वसुल करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहील.

12) सदर प्रकल्पांतर्गत घनकच-यावर प्रक्रिया करताना रिसायकलेबल मटेरीयल उदा.प्लास्टिक,लोखंड, रबर, पेपर आणि इतर रिसायकलेबल मटेरीयलचे कंत्राटदाराला नियमात नमुद केलेल्या पध्दतीने विल्हेवाट करणे बंधनकारक राहिल तसेच कच-याचे वर्गीकरण कंत्राटदारास करावे लागेल.

13) सदर प्रकल्पाचा सुरक्षीतेचे संपुर्ण व्यवस्था कंत्राटदाराला करावे लागेल व त्यासाठी महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. तसेच सुरक्षे अंतर्गत सुरक्षा भिंत, आग, चोरी, नुकसान इ. चा विमा यांचा समावेश राहिल. तसेच प्रकल्पा ठिकाणी आग नियंत्रण उपकरण लावणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक वाहन व डेपो वरील कर्मचारी वर्ग तसेच या प्रकल्पाचा भाग असलेल्या कोणत्याही बाबी पासुन नागरीकांस किंवा प्रकल्पाजवळ असलेल्या जिवितास कोणत्याही प्रकारचा अपघात अथवा मृत झाल्यास त्याचा विम्याचे संरक्षण असणे कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

14) सदर कंत्राटदारास त्याच□ कंपन□ हि कंपन□ अँक्ट अंतर्गत पंजकृत करणे तसेच कंत्राटदाराचे सर्व कर्मचा-याना कंपन□ अँक्टच्या तरतुदी देणे बंधनकारक आहे.व त्याच प्रमाणे कंत्राटदार हा कर्मचा-यांच्या सेवेत□ सेवा विषयक बाब□ वेतन, फंड, भत्ता यास सर्वस्व□ जबाबदार राहील. कर्मचा-याच□ इ.प□एफ., प□प□एफ. इ. शासन नियमानुसार कंत्राटदारास भरावे लागेल.

15) सदर प्रकलपांतर्गत आवश्यक व पुरेशा कर्मचा-यांन□ नेमणुक करणे, प्रचलित नियमानुसार त्यांच्या सेवा शर्ती ठरविणे. कंत्राटदाराव्दारे नियुक्त करण्यास येणा-या कामगारांच□ संपुर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याच प्रमाणे कंत्राटदारास प्रकल्पावर कार्यरत असणा-या कामगारांना ओळखपत्र वितरीत करावे लागत□. सदर प्रकल्पावर कंत्राटदारास कामगार नियुक्त करतांना कोणत्याही गुन्हेगारांच□ नोंद असलेल्या व्यक्तीस कामावर ठेवले जाणार नाही. याच□ खबरदारी घ्याव□ लागेल.

16) सदर प्रकल्पामुळे प्रकल्पाचे आजुबाजुस परिसरात□ शेतकरी, व्यावसायिक व सदरच्या प्रकल्पा मध्ये काम करणारे कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारे प्रदुषण अथवा उपद्रव होणार नाही यासाठी नियमांतर्गत नमुद (परिच्छेद 4 अ व ब ) सर्व बाबँ□च□ पुर्तता कंत्राटदाराला कराव□ लागेल व त्यासाठी Monitoring System ठेवाव□ लागेल. तसेच कोणत्याही प्रकारच□ जिवितहाण□, इजा, भरपाई, नुकसान अथवा कोर्टदावे झाल्यास व त्यांन□ हरकत घेतल्यास त्यास मनपा जबाबदार राहणार नाही.

17) सदर प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराला महानगरपालिका क्षेत्रात प्रशासकीय कार्यालय ठेवावे लागेल व सदर कार्यालयात दुरध्वन□च□ व्यवस्था ठेवाव□ लागेल. सदर कार्यालय हे महानगरपालिकेने निर्देश□ केलेल्या अधिका-यांच्या संपर्कात राहील.

18) सदर प्रकल्पासाठी उपसंविधा (Sub Contract) देता येणार नाही व कोणताही उप कंत्राटदाराच□(Sub Contract) नेमणुक करता येणार नाही. प्रकल्प कालावध□ करीता संबंध□ कंत्राटदार हाच महानगरपालिकेस जबाबदार राहिल.

19) सदर प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराला सेल रजिस्टर ठेवावे लागेल व त्या सर्व अकौंट्सच्या नोंदी ठेवाव्या लागत□ तसेच सर्व अकौंट्स हे अधिकश्त चार्टर्ड अकौटंट यांचे कडुन प्रमाण□ करुन घ्यावे लागत□. सदर रजिस्टरच□ तपासण□ करण्याचा अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांन□ नामनिर्देश□ केलेल्या व्यक्तीस राहील.

20) सदर प्रकल्प कंत्राटदाराला भारत सरकार वन व पर्यावरण मंत्रालय नव□ दिल्ल□ यांन□ नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळण□) नियम 2000 प्रमाणे व तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांन□ प्रसारीत केलेल्या अधिसुचना व नियमानुसार राबवायचा आहे. तसेच हे नियम व या नियमात वेळोवेळी होणा-या सुधारणाचे पालन करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

21) सदर प्रकल्पा करीता कंत्राटदाराला नियमात नमुद केलेल्या विविध बाब□चा उच्चतम प्रमाण□ स्तर (Standard) राखावा लागेल व त्या संदर्भात आवश्यक अहवाल विहित नमुन्यात तयार करुन नियमानुसार ठरविलेल्या कालावध□ संबंध□ विभागास पाठवावे लागत□.

22) सदर प्रकल्पाच्या कालावधी दरम्यान प्रकल्पाला वेळोवेळी भेट देवुन प्रकल्पाच्या विकास तसेच कच्चा माल, तयार माल, स्टॉक रजिस्टर, अकौंटस इ. चे पाहणी निरीक्षण करण्याचा अधिकार मा.महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी नामनिर्देशीत केलेला अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सर्व सुचना पाळणे बंधनकारक राहील. तसेच प्रकल्पाचे पाहणी, निरीक्षण, निर्मिती अहवाल सदर कंत्राटदाराकडुन अहमदनगर महानगरपालिकेस प्रत्येक महिन्यात नियमीत द्यावा लागेल.

23) सदर प्रकल्पात कोणत्याही प्रकारचे तांत्रिक अथवा इतर अडचणी निर्माण झाल्यास (नैसर्गिक आपत्ती सोडुन तसेच मानवी नियंत्रणा बाहेरच्या अडचणी सोडुन) किंवा प्रकल्पाचे काम बंद झाल्यास कंत्राटदाराला 7 दिवसांचे आत प्रकल्प पुर्ववत कार्यांवित करावे लागेल व प्रकल्प कार्यांवित होई पर्यंत घनकच-याचा विल्हेवाट (परिच्छेद 4 अ व ब ) प्रमाणे नियमात नमुद केलेल्या तांत्रिक पध्दतीने करावे लागेल. सदर प्रकल्प एक महिन्याच्या आत पुर्ववत करण्यास कंत्राटदाराला अपयश आल्यास अहमदनगर महानगरपालिका कंत्राटदारास तीन महिन्याचे पुर्व नोटीस देवुन करारनामा रद्द करेल तसेच सदर कंत्राटदाराचे काम असमाधानकारक वाटल्यास किंवा करारनाम्यातील अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास सदर कंत्राटदारा बरोबर मनपाने केलेला प्रकल्प करारनामा कुठल्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार 1 महिन्याची आगावु नोटीस देवुन मा.आयुक्त अहमदनगर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे व ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.प्रकल्प बंद पडल्यास मनपा मार्फत कुठल्याही प्रकारची भरपाई दिली जाणार नाही व त्या दिनांकापर्यंत कंत्राटदाराने उभारलेली सर्व मशीनरी व इमारती मनपा ताब्यात घेईल.

24) महानगरपालिका व संबंधीत कंत्राटदार यांचे मध्ये कोणताही वाद उत्पन्न झाल्यास त्याचे अधिकारीता क्षेत्र अहमदनगर न्यायालयांतर्गत राहील व दुसरे कोणतेही न्यायालयांतर्गत राहणार नाही व त्यासाठी येणारा खर्च संबंधीताना करावा लागेल.

25) सदर प्रकल्पासाठी वर उल्लेखीत केलेल्या अटी व शर्ती मध्ये कोणतेही त्रुटी राहिल्यास भारत सरकार वन व पर्यावरण मंत्रालय, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2000 व त्यात वेळोवेळी होणा-या सुधारणा यांचे अंतर्गत नमुद केलेल्या नियमानुसार कारवाई करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

26) सदर प्रकल्पाबाबत असलेल्या अटी व शर्ती मध्ये फेरबदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांना राहील.

27) सदर प्रकल्पाशी संबंधीत कोणतीही तक्रार महानगरपालिका आयुक्त यांचे जवळ आल्यास व सदर तक्रार महानगरपालिका आयुक्त यांना ग्राह्य वाटल्यास त्यांचे निवारण सात दिवसांचे आत करणे कंत्राटदार यांचेवर बंधनकारक राहील व सात दिवसांचे आत तक्रार दुर करण्यास कंत्राटदार अयशस्वी ठरल्यास तक्रार दुर होईपर्यंत प्रतिदिन रु.1000/- इतका दंड कंत्राटदाराला करण्याचा अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका यांना राहील.

28) सदर प्रकल्पांतर्गत कंत्राटदाराव्दारा इतर कोणत्याही पक्षाशी निष्पादीत केल्या गेलेल्या कोणताही करार महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही.

29) प्रकल्प 3 वर्षानंतर अथवा प्रकल्प हस्तांतरणाच्या वेळी त्या अंतर्गत समाविष्ठ बाब म्हणजेच प्लांट परिसर, मशिनरी व इतर अनुषंगाक बाब या महानगरपालिकेला सुस्थितत (Working Condition) मध्ये हस्तांतरीत करणे कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

30) नियमानुसार सर्व शासकीस करांच कपात करण्यात येइल.

तरी बुरुडगाव स. नं.३४ या ठिकाणी निर्माण होणा-या घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या Expression of interest बाबत मे.पार्श्व एन्टरपाईजेस, पुणे या एजन्सीचे यांत्रिकी साहित्य पुरविणे व बसविणे व ३ वर्षाकरीता प्रकल्प चालविणे बाबत नमुद केलेल्या दराबाबत निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सविनय सादर.

येणे प्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मा.छाननी समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे मे. पार्श्व एन्टरप्राईजेस, पुणे यांनी मनपाकडे सादर केलेल्या E.O.I. बाबत [यांत्रिकी साहित्य पुरविणे व बसविणे व ३ वर्षाकरिता प्रकल्प चालविणे] निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रकल्प अभियंता यांनी प्रस्तावीत केल्यानुसार घनकच-यावर प्रक्रिया करणेच्या प्रकल्प उभारणीकरिता प्रस्ताव दरपत्रक मंजूरीस्तव **अ** नुसार मा.स्थायी समिती सभेने ठेवणेस हरकत नाही मे. आदेशार्थ स. सादर

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेनुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- निविदा किती

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- एकच निविदा प्राप्त झाली तो प्रोजेक्ट आता चालू आहे. आमच्या समोर ट्रायल केली होती.

मा.सभापती साहेब :- पहाणी कोठे केले.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- बार्शीला गेलो होतो.

मा.सभापती साहेब :- प्रोजेक्ट चालू होता का

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- ट्रायल चालू होती.

मा.श्री. सचिन जाधव :- या एजन्सीने कोठे काम केले.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- बार्शी ला.

मा.श्री.संपत बारस्कर :- निर्णय घेण्यापुर्वी छाननी समितीचा रिपोर्ट वाचणे योग्य होईल.

मा.श्री. दिप चव्हाण :- छाननी समितीचा रिपोर्ट वाचा.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- उभारणीचा अनुभव नाही. सार्व. बांधकाम विभाग चे रजि. नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- यांना अनुभव नाही. रजिस्ट्रेशन नाही. त्यांची एकच निविदा आहे. तसेच त्यांचेकडे कोणत्या कंपनीच मशीन आहे.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- त्यांनी स्वतःचे डिझाइन केलेले आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- त्याची कॅपीसटी किती काय ते सांगा.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- त्याची टेक्नीकल सँक्शन आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्याच्या संदर्भात रॉयल्टी १ लाख देईले म्हणता. त्याची खत निर्मिती किती, त्याला किती जागा देतो.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- ३० टन

मा.श्री. दिप चव्हाण :- एकच निविदा आली तर उघडताच येत नाही खत विक्री याचा हिस्सा किती याचा उल्लेख नाही. १ लाख रॉयल्टीचा बेस नाही त्याला अनुभव नसताना दरात तडजोडी केल्या त्यानी १०% मागीतले त्याचा आधार कोणता ते लिहिले नाही. तसेच ६८ लाखाचा वजन काटा म्हणता ते कसे शक्य

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- ते अेकत्रीत आहे

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- फक्त काटयाचे सांगा.

मा.श्री. दिप चव्हाण :- प्रत्येक मशीनरीचे सांगा.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- टोटल कोटेशन आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- ते वेगवेगळे सांगा कोणते मशीन कोणते काम करणार

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- यांचे DSR नाही

मा.श्री. दिप चव्हाण :- याचे एकच टेंडर आहे टेक्नीकल अनुभव नाही त्यामुळे हे रिकॉल करा.

मा.सभापती साहेब :- यात काय प्रक्रिया केली.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- बी.ओ.टी. निविदा काढल्या. मशीन त्याची स्वतः डिझार्डन केली आहे. ती mjp ला दाखवून T.S. घेतली. छाननी समितीने छाननी केली.१६ मजूर स्किल्ड लगतील असे एकूण हिशोब काढून २१८ केले आहे. त्यावर २२५ केले पण तो तयार नाही. ३११ पेक्षा कमी करणार नाही असे त्याने सांगीतले.

मा.श्री. दिप चव्हाण :- तो तयार नाही तर करू नका.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- हे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट आहे त्याला ३ अर्जाचा मुद्दा नसतो.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- कोर्टाचे काय आहे.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- ५ लाख डिपॉझीट करायला सांगितले.

मा.श्री. दिप चव्हाण :- ही कॉम्प्लेन्सेशन नाही. डिपॉझीट नाही. फक्त ते भरायचे आहे.

मा.श्री. अजिंक्य बोरकर :- परत रिकॉल करा.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- यामध्ये रिकॉल करण्याची तरतूद नाही.

मा.सभापती साहेब :- वाटाघाटीचा अधिकार कोणाचा
मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- आयुक्तांनी कमिटी केली आहे.
मा.श्री. दिप चव्हाण :- स्थायी समितीचाअधिकार नाही का ?
मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- स्थायी समिती सुध्दा करू शकते.
मा.सभापती साहेब :- वाटाघाटीसाठी स्थायी समिती समोर पाहिजे. कागदपत्रे फक्त तुम्ही पहा.
मा.श्री. उमेश कावडे :- मागे यावर चर्चा झाली होती. याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.
मा.श्री. दिप चव्हाण :- ज्याने त्याने ज्याच्या त्याचा अधिकारानुसारच कार्य करणे आवश्यक आहे.
मा.श्री. संपत बारस्कर :- वाटाघाटी स्थायी समिती समोर करा
मा.श्री.अजिंक्य बोरकर :- त्यानंतर निर्णय घेउ. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवू.
मा.सभापती साहेब :- वाटाघाटी स्थायी समिती समोर करा व याकरीता पुढील सभेमधे हा विषय घेईल त्या दिवशी समक्ष वाटाघाटी करण्याकरीता प्रकल्प विभागाने समितीच्या सभेमध्ये संबंधीत एजन्सी ला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं. ३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्टावर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

वाटाघाटी स्थायी समिती समोर करा व याकरीता पुढील सभेमधे हा विषय घेईल त्या दिवशी समक्ष वाटाघाटी करण्याकरीता प्रकल्प विभागाने समितीच्या सभेमध्ये संबंधीत एजन्सी ला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.
सुचक :-मा.श्री.संपत बारस्कर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १४ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १४ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीतील राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपटयांचे सोशियो इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व बांधकामावर सुपरव्हिजन करणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या ई निवीदांचा तुलनात्मक तक्ता मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा प्रकल्प विभाग दिनांक दिनांक

विषय- ई-निविदा क्र.५७९ राजीव आवास योजने अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये झोपडपटयांचे सोशियो इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व बांधकामावर सुपरव्हिजन करणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या ई निवीदांचा तुलनात्मक तक्ता मंजुरीस्तव.

उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१] प्रशासकीय मान्यता : मा. स्थायी समिती सभा क्रमांक-०१ विषय क्र. १८ दि०८/०४/२०१३

२] ऑनलाईन ई- : निविदा क्रमांक ५७९ सन २०१३-१४

३] निविदा विक्री कालावधी : दि.१६/०४/२०१३ ते २५/०४/२०१३

४] निविदा स्विकारण्याची तारीख : दि.२९/०४/२०१३

५] निविदा उघडण्याची तारीख : दि. ०२/०५/२०१३

६] कामाची मुदत : २४ महिने

सदर कामाचे तांत्रिक लिफाफे उघडले असता एकुण खालीलप्रमाणे तीन निविदा प्राप्त झाल्या.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव |
|---|---|
| १ | मे. आर्क असोसिएटस , औरंगाबाद |
| २ | वाप्कोस लिमिटेड , गुजरात |
| ३ | जेएम इन्वायरोनेट प्रा.लि. , जयपुर |

वरील तीन निविदा धारकापैकी जेएम इन्वायरोनेट प्रा.लि. जयपुर राजीव आवास योजना करीता आवश्यक असलेल्या अनुभवाची पात्रता नसल्यामुळे त्यांची निविदा ग्राहय धरण्यात आली नाही. वाप्कोस लिमिटेड, गुजरात यांचे बाबत राजीव आवास योजनेचा मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा अनुभव चांगला नाही. सदर बाबत मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी तसे पत्रामध्ये कळविले आहे. त्यामुळे मे. आर्क असोसिएटस , औरंगाबाद या एजन्सीची एकच निविदा तांत्रिक लिफाफ्यामध्ये पात्र ठरली आहे.

मे. आर्क असोसिएटस यांचा व्यापारी लिफाफा उघडला असता त्यांनी खालील प्रमाणे दर नमुद केले आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नाव | देकार |
|---|---|---|
| १ | मे.आर्क असोसिएटस, औरंगाबाद | मा.केंद्र शासनाने राजीव आवास योजनेच्या सर्व्हेक्षण व DPR तयार करणे करीता नमुद केलेल्या दराबाबतच्या Guidelines तुलनेत ०.१ % कमी |

यांनी निविदेमध्ये केंद्र शासनाच्या दराबाबतच्या नमुद Guidelines च्या तुलनेत ०.१ % कमी दराने काम करणे बाबत प्राप्त निविदेमध्ये दर नमुद केलेले आहेत. तसेच Scope of work मधील Consruction and Supervision चे काम वगळणे बाबत दि.०३/०३/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर बाबत दि.०६/०५/२०१४ रोजी झालेल्या छाननी समितीमध्ये खालीलप्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे.

**सदर कामासाठी प्राप्त निविदा धारक मे. आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांनी निविदेत नमुद केलेले दर Part-A सर्व्हेक्षण करणे, Part-B- DPR तयार करणेचे काम Cetnral Govt.Guidelinesमधील दरापेक्षा ०.१%कमी दराने करणेबाबत व निविदेमधील Consruction and Supervision चा Scope of work वगळणे बाबत छाननी समिती शिफारस करीत आहे.**

सदर योजनेकरीता सर्व्हेक्षण व DPR तयार करणे करीता मा. शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे. तरी राजीव आवास योजने अंतर्गत सर्व्हेक्षण करणे व DPR तयार करणे या कामासाठी एजन्सी नेमणूकीकरीता प्राप्त निविदा मा.स्थायी समिती कडे सादर करणेबाबत मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे प्रकल्प अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मे.आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांनी छाननी समितीकडे सादर केलेल्या पत्राप्रमाणे राजीव आवास योजने अंतर्गत सर्व्हेक्षण करणे व DPR तयार करणे या कामासाठी प्राप्त निविदा व त्याबाबत मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशीबाबत निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा सहमती दर्शक सही

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत अ नुसार प्रस्ताव मा. स्थायी समिती सभे सादर करणेस हकरत नाही मे. ओदशार्थ स. सादर.

यावर आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--** --

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपटयांचे सोशियो इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व बांधकामावर सुपरव्हिजन करणे करीता एजन्सी नियुक्ती विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- GIS,MIS चे इथेही आहे बजेटमध्ये ही आहे. असे २-२ कोट खर्च का करता गुगल वर सगळे दिसते.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- राजीव आवास ही योजना वेगळी. ही डॉईंग , एस्टीमेंट हा करण्याकरीता एजन्सी नेमायची आहे.

प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- याकरीता सेंन्ट्रल गव्हरमेंट चे दर आहेत.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- हा सरकारी आहे का खाजगी
प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- खाजगी
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- फेज-२ च्या बाबबतीत स्टडकॉमचे काय झाले ते सांगा.
मॅके.इंजि. श्री. निकम :- त्यांनी करारनामा करताना ज्या अटी घातल्या त्यानुसार काम केले नाही. त्यामुळे रद्द केले.
मा.सभापती साहेब :- आधीच्या ची माहिती द्या नंतर याला मान्यता देउ
मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- हा पाणी पुरवठाचा विषय आहे यांनी वारूळा मारूतीच्या घराची योजना केली.
प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :- काटवन खंडोबा येथे काम चालू
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- तेथे तर काम झाले आहे.
प्रकल्प विभाग श्री. मेहेत्रे :-शहरात एकुण २२ स्लम आहेत तेथे हे बांधणार आहोत.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- गव्हरमेंटची एजन्सी नेमा.
मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- आज २ स्कीमवर हिच एजन्सी आहे त्यांनी काम चांगले केले.
मा.श्री.शेख फैय्याज अजिजोद्दीन :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.श्री. बाळासाहेब बोराटे:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेच्या हददीतील राजीव आवास योजने अंतर्गत झोपडपटयांचे सोशियो इकॉनॉमिक सर्व्हे GIS,MIS सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व बांधकामावर सुपरव्हिजन करणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या ई निवीदांचा तुलनात्मक तक्ता व त्यावरील ऑफिस रिपोर्टमध्ये पाहाता मा. छाननी समितीने केलेल्या शिफारशी नुसार मे. आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांनी मा.केंद्र शासनाने राजीव आवास योजनेच्या सर्व्हेक्षण व DPR तयार करणे करीता नमुद केलेल्या दराबाबतच्या Guidelines तुलनेत ०.१ % कमी दराने काम करण्यास मान्यता दिली असुन त्या दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.शेख फैय्याज अजिजोद्दीन सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १५ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १५ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ मधील भुषणनगर केडगाव येथील महिला जिम महानगरपालिकेमार्फत चालविणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा सार्व. बांधकाम विभाग

संदर्भ :- मा.उपमहापौर सौ. सुवर्णा संदिप कोतकर यांचे दि.१३/२/२०१४ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, केडगाव भुषणनगर मधील महानगरपालिकेने सन २००८ मध्ये बांधलेल्या व्यायाम शाळेत व्यायाम साहित्य पुरविलेले असुन सदर जिम महिला करिताच वापरणेचे प्रयोजन होते. बांधकाम पुर्ण होवून साहित्य आणलेनंतर महिला प्रशिक्षक महानगरपालिकेने नेमुन व्यायामशाळा चालवावी असे ठरले परंतु सदर पद आस्थापनावरती मंजुर नसलेने खाजगी तत्वावर चालविणेचे ठरले नुसारचा अहवाल खालीलप्रमाणे..

१) मा.स्थायी समिती ठराव क्र.१७ दि.२८/७/२००९ नुसार सदर महिला जिम खाजगीकरणातुन चालविणेस मंजुरी
२) मा.स्थायी समिती ठराव दि.३०/८/२०१० नुसार जीम भाडेतत्वाने चालविण्याबाबत मागणी असलेले संस्थांची माहितीस्तव सादर करावे असे ठरले.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.११ दि.२७/४/२०११ नुसार हिरकणी बचत गटास दरमहा रू.५००/- व १०,०००/- डिपॉसीट घेवुन चालविणेस देणे
४) मा. महासभा ठ. क्र.१० दि.२५/५/२०१२ अन्वये स्वयंसेवी संस्थेस रू.१०,०००/-अनामत व रू.२०००/-प्रतिमाही या किमान देकार निश्चित करून निविदा पध्दतीने जिम चालविणेस द्यावी.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.१२ दि.५/४/२०१३ अन्वये जयभद्रा महिला बचत गटास रू.६०००/- प्रतिमाह इतकी जीम चालविणेस मंजुरी.
६) इकडील पत्र जा.क्र.८९दि.३०/४/१३ करारनाम्यातील व पुढील कार्यवाहीस मार्केट विभागाकडे
७) मार्केट विभाग अंतिम नोटीस १८५ दि.२१/८/२०१३ दिली परंतु दि.१४/८/२०१३ अन्वये सदर बचत गट महिला जिम चालविणेस असमर्थ
८) मा.उपमहापौर सौ. सुवर्णा संदिप कोतकर यंनी दि.१३/२/२०१४ रोजी पत्र देवून महानगरपालिकेमार्फ त महिला इन्स्ट्रक्टर नेमुन वॉचमनची नेमणूक करून जिम चालवावी अशी मागणी केलेली आहे.
९) महानगरपालिकेचे इतर जिम बद्दलीची क्रिडा विभागाने दिलेली यादी खालील प्रमाणे

a) गोरक्षनाथ व्यायाम शाळा, शिंदेनगर, वैदुवाडी प्रभाग समिती क्र.
b) शितळादेवी पटांगण व्यायामशाळा, शनिचौक , गुजरगल्ली
c) जिव्हेश्वर मंदिराजवळ, घोरपडे हॉस्पीटल जवळ, दिल्लीगेट
d) माळीवाडा हरिजनवस्ती , माळीवाडा
e) राणीलक्ष्मीबाई चौक, भुषणनगर
f) नवरत्न व्यायामशाळा , माळीवाडा
g) जावेद कॉलनी, व्यायामशाळा, जुने मुंकुंदनगर.

h) दत्तु खलिफा (सिध्दीबाग), व्यायामशाळा , सिध्दीबाग जवळ
i) सिध्दार्थनगर हरिजनवस्ती, व्यायामशाळा (वीर लहुजी वस्ताद). सिध्दार्थनगर
j) जुने मुकुंदनगर तालीम, जुना मुकुंदनगर
k) सर्जेपुरा हरिजनवस्ती व्यायाम शाळा, सर्जेपुरा
l) शंभुराजे व्यायामशाळा, दत्त चौक भुषणनगर केडगाव
m) शिवसमर्थ व्यायाम शाळा , लोंढेमळा, केडगाव
n) सर्जेपुरा व्हाईट हाउस, सर्जेपुरा
o) मोशिन सोशल क्लब (सौभाग्य सदन) पटवेकर गल्ली, माळीवाडा
p) वरद जिम नॅशियम (पुरूष), आनंदी बाजार अहमदनगर
q) एकनाथनगर केडगाव व्यायामशाळा
r) कपिलेश्वर व्यायाम शाळा माळीवाडा

वरील अहवालान्वये मा. महासभा व मा.स्थायी समितीने जिम खाजगी तत्वावर चालविणेस मंजुरी दिली व त्यानुसार कार्यवाही करून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने महानगरपालिकेने भुषणनगर महिला जिम व इतर जिम मध्ये संबंधीत प्रभाग अधिकारी यांचे अधिपत्याखाली वॉचमनची नेमणूक करणे व क्रिडा विभागामार्फत संबंधीत प्रभाग अधिकारी यांचे अधिपत्याखाली देखभाल दुरूस्ती करणे योग्य होईल व नागरिकांना सदर जिम विना मोबदला वापरण्यास देणे योग्य व तसा आदेश सा.प्र.वि. मार्फत संबंधितांना होणे योग्य /**अ**

तथापि रिपोर्ट सक्षम प्राधिकरणाकडे प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, **अ** प्रमाणे मान्यता देणे योग्य

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत **अ** नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, **अ** नुसार मान्य

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- प्रभाग समिती क्रमांक-४ मधील भुषणनगर केडगाव येथील महिला जिम महानगरपालिकेमार्फत चालविणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. सुनिता कांबळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आधी कोण चालवत होते.

मा.सौ. सुनिता कांबळे :- बंद आहे तिचा वापर नाही.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- आज कोण चालवते.

शहर अभियंता श्री.मगर :- टेंडर काढले NGO जयभ्रदा महिला बचत गट ला दिले.स्थायी समितीच्या ठरावाने दिले परंतु महिला बचत ने डिपॉझीट भरले नाही. वर्कऑर्डर घेतली नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- संस्थेने कळवले आहे.

मा.सौ.सुनिता कांबळे :- त्यांचेवर कारवाई केली का ?

शहर अभियंता श्री. मगर :- मा.उपमहापौर यांची भेट दिल्यावर असे ठरले की १ व्यक्तीची नेमणूक करावी , स्वच्छता , वॉचमन, साहित्य द्या.

मा.सभापती साहेब :- त्या प्रभाग अधिका-यांना सूचना देउन त्वरीत कार्यवाही करावी.

मा.सौ. सुनिता कांबळै :- १] केडगाव भुषणनगर येथील महिला जिम खाजगी तत्वावर चालविणेबाबत टेंडर मागविण्यांत आले होते का ? ,२] कोणकोणत्या निविदाधारकांनी टेंडर भरले होते ? व ते किती रकमेचे होते.? , ३] निविदा मंजुर झाल्यानंतर त्यांच्याशी करारनामा करण्यात आला का ? ४] का करण्यात आला नाही ? , ५] निविदाधारकांनी करारनामा केला नसल्यामुळे त्यांच्यावर काय कारवाई केली ?, ६] का केली नाही ? , ७] त्यांना काळया यादीत टाकणेबाबत तातडीने प्रस्ताव सादर करावा.

शहर अभियंता श्री.मगर :- शहरातील व्यायामशाळांना व्यायाम चे साहित्य क्रिडा विभागाकडून देण्यात येते.

मा.सौ.सुनिता कांबळे :- भुषणनगर येथील महिला जिम बांधुन ५ वर्षे झालेली आहेत परंतु अद्यापपर्यंतही महानगरपालिकेने महिलांसाठी जिम खुली करून दिली नाही. या जिमचा उद्देश महिलांचे स्वास्थ्य व शरीरप्रकृती आरोग्यदृष्टया चांगली रहावी या चांगल्या उद्देशाने अद्यावत व्यायाम यंत्रसामुग्री बसविलेली आहे.परंतु सर्व साहित्य धुळखात पडुन आहे. महानगरपालिकेने महिलांना जिमची सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. महानगरपालिकेमार्फत महिलांना व्यायामासाठी जिम तात्काळ सुरू करावी व आवश्यक दुरूस्ती व कर्मचारी नेमावेत.

मा.सौ.सुनिता कांबळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.शेख फैय्याज अजिजोद्दीन :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी करण्यात यावा.

**<u>ठराव</u>** :- अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग समिती क्रमांक-४ मधील भुषणनगर केडगाव येथील महिला जिम महानगरपालिकेमार्फत चालविणे बाबत. ऑफिस रिपोर्टमध्ये नमूद अहवालान्वये मा. महासभा व मा.स्थायी समितीने जिम खाजगी तत्वावर चालविणेस मंजुरी दिली व त्यानुसार कार्यवाही करून योग्य प्रतिसाद न मिळाल्याने महानगरपालिकेने भुषणनगर महिला जिम व इतर जिम मध्ये संबंधीत प्रभाग अधिकारी यांचे अधिपत्याखाली वॉचमनची नेमणूक करण्यात यावी व बांधकाम विभागाने संबंधीत प्रभाग अधिकारी यांचे अधिपत्याखाली देखभाल दुरूस्ती करण्यात यावी व नागरिकांना सदर जिम विना शुल्क वापरण्यास उपलब्ध करून दयावी, तसेच व्यायाम प्रशिक्षकाचे पद आस्थापनासुचीवर मंजुर नसल्याने खाजगी तत्वावर प्रशिक्षक नेमणूक करून चालविण्यात यावे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.सुनिता कांबळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.शेख फैय्याज अजिजोद्दीन सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महिनगरपालिका

**अहमदनगर महनगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्रमांक- २**

विषय क्रमांक- १६ सोमवार दि. ०२/०६/२०१४

ठराव क्रमांक- १६ सोमवार दि. ०२/०६/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे एस.टी. स्टॅण्ड जवळील इंम्पिरियल चौकातील शेतक-यांचा पुतळा काढणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-**अ.नगर मनपा सार्व. बांधकाम विभाग दिनांक

संदर्भ :- तत्कालीन नगरपालिकेचे नगररचना विभाग /९९४ दि.५/७/१९९७

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विंनती रिपोर्ट देण्यात येतो की, बोथरा उद्योग समुहाने दि.१९/३/१९९७ रोजी तत्कालीन नगरपालिकेकडे विषयांकित चौक सुशोभिकरणासाठी मागणी करण्यात आलेली होती त्यानुसार संदर्भिय पत्रान्वये अटी शतीस अधिन राहून परवानगी देण्यात आलेली होती व त्यानुसार नांगर फाळ घेतलेला शेतक-यांचे पुतळा बसवून चौक सुशोभिकरण केलेला आहे.

सद्यस्थितीत स्टेशन रस्त्याचे रूंदीकरणाचे काम जागतिक बँक प्रकल्पामार्फत प्रगतीत आहे व त्या रूंदीप्रमाणे जागतिक बँकेने रूंदीकरणासाठी दिलेला अतिक्रमणामध्ये सदर वास्तुचे नांव आहे. तसेच संदर्भिय परवानगीमधील अट क्र. १ नुसार वाहतुक वरचे बांधकाम राज्य रस्त्याचे हद्दीपासून ५ मीटर अंतरावर करावयाचे आहे. सद्यस्थितीत सदर अटीची पुर्तता होत नसलेने सदर पुतळा काढणे अत्यंत आवश्यक आहे. व त्याबाबत जेष्ठ नागरिकांनी वेळोवेळी मागणी करित आहेत. याबाबत नगररचनाकार यांचेशी वेळोवेळी समक्ष चर्चा देखील झालेली आहे. व त्यांनी देखील याबाबत सहमती दर्शविली आहे.

त्यानुसार बोथरा उद्योग समुहास ७ दिवसांची अंतिम नोटीस देणे योग्य अगर तद्नंतर कार्यवाही न केल्यास अतिक्रमण विभागामार्फत पुतळा काढण्याची पुढील कार्यवाही करणे नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेवून रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

येणेप्रमाणे कनिष्ठ अभियंता यांचा अहवाल असे.

यावर सहा.नगररचनाकार यांचा अभिप्राय की, मा. शहर अभियंता यांचे प्रस्तावानुसार तसेच मा.नगररचनाकार यांचेशी झालेल्या चर्चेनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालान्वये व देण्यात आलेल्या परवानगी मधील अटीनुसार संबंधितास कळविले बाबत मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार संबंधीतास ७ दिवसाची नोटीस देउन पुढील कार्यवाही करणे योग्य

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, सदरचा प्रस्ताव पाहता मान्यता देणे उचित तथापि मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य सबब आदेशार्थ.

यावर आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, अ नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे एस.टी. स्टॅण्ड जवळील इंम्पिरियल चौकातील शेतक-यांचा पुतळा काढणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- टी.पी.चे लोक माहिती द्या. असे किती पुतळे येतात ते सांगा.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- त्याला मुदत करारनामा आहे का ?

सहा.नगररचनाकार श्री. जोशी :- फाईल पाहून सांगतो.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- जर करार असेल तर तो कोर्टात गेला तर काय ?

अतिक्रमण प्रमुख श्री. इथापे :- नगर-पुणा मार्गावर प्रस्तावीत उड्डणपुल आहे त्याची मोजणी केली त्यावेळी रस्त्याच्या २ बिल्डींगला १५ फुट मार्कींग आहे. आपली प्रॉपर्टी हा पुतळा, शिवाजी महाराज पुतळा, महावीर कलादालन हे त्यामध्ये येतात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- बस थांबे वगैरे साठी पुतळा काढणे आवश्यक आहे. पण कारवाई त्वरीत व्हावी. पण पुतळा काढायची कारवाई सात दिवसात होणार का ?

अतिक्रमण प्रमुख श्री. इथापे :- होईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- हा पुतळा काढणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- हा पुतळा काढणे आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.कुमार वाकळे :-काढलेला शेतक-याचा पुतळा बोल्हेगांव परिसरामध्ये बसविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- बोथरा उद्योग समुहास ७ दिवसांची नियमानुसार अंतीम नोटीस देणे व नोटीसीची मुदत संपल्यानंतर सुध्दा पुतळा काढला गेला नाही. तर अतिक्रमण विभागामार्फत सदर पुतळा काढण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व ऑफिस रिपोर्टानुसार सर्वानुमते मंजूरी करण्यात यावा.

**ठराव :-** तत्कालीन नगरपालिककेचे परवानगीने अहमदनगर एस.टी. स्टॅण्ड जवळील इंम्पिरियल चौकात उभारलेला शेतक-यांचा पुतळा काढणेबाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद प्रस्तावाप्रमाणे ठराव मंजूर.बोथरा उद्योग समुहास ७ दिवसांची अंतीम नोटीस देणे व नोटीसीची मुदत संपल्यानंतर बोथरा उदयोग समुह यांचे कडून शेतक-याचा पुतळा काढला गेला नाही. तर अतिक्रमण विभागामार्फत सदर पुतळा काढण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य बोरकर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका